MAHARASHTRA MANDAL
CHICAGO
रचना
महाराष्ट्र मंडळ शिकागो
पौष शके १९४३
जानेवारी २०२२

CHARLES RUTENBERG REALTY
"The Standard of Excellence"

Serving the Downtown Chicago Area & All Suburbs

BUY

SELL

INVEST

RENT

Please contact us for all of your real estate needs

Sangeeta Chavan
Licensed Real Estate Broker
(630) 728-4871
sangeeta_chavan@yahoo.com

Hemant Chavan
Licensed Real Estate Broker
(630) 660-6231
hxchavan@yahoo.com

Free Market Evaluation of Your Property

Detailed Comparative Market Analysis to Buy or Sell Your Property

+ Primary Home
+ Rental Properties
+ Investment Properties
+ Commercial Properties

Home Staging & Extensive Network of Licensed Professionals

+ Inspectors
+ Attorneys
+ Mortgage Brokers
+ Handyman

CHARLES RUTENBERG REALTY
"The Standard of Excellence"

OUR OFFICE

3135 Book Road
Naperville, IL 60564

अनुक्रमणिका

अध्यक्षीय 6
संपादकीय 8
कार्यकारिणी 9
MMC Trustees 12
MMC Investment Advisors 12
बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी 12
MMC शाळा कार्यकारिणी 12
MMC 2022 Volunteers 13
महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२२ Logo 14
संक्रांत २०२२ कार्यक्रम 16
अध्यक्षीय चष्म्यातून 17
गुळाची पोळी 19
संक्रांत मेळावा 20
मैत्रीचा संदेश - संक्रांत 20
रचना 21
Taming the Stress Tiger 22
विचार एका रम्य सकाळी 28
Pocket Stars – My FLL Experience 29
The Sky and the Sea 32
शब्दकोडे 35
मित्र 36
सप्टेंबर २०२१ ते मार्च २०२२ दिनदर्शिका 37
कृष्ण आणि अर्जुन 38
आयसिंग ऑन द केक 39
दही 42
नामदेव मल्हारजी म्हात्रे 44
मोहिनी 54
व्याख्यानाचा वृत्तान्त 57
शब्द-फुले! 58
Party 59
रामायण पुनरावलोकन 61
एका शुभसंदेश पत्रिकेतील बालिकेस 65
पुस्तकातून प्रकाशाकडे 66
भुताने पकडले 68
पुरणपोळी आईस्क्रीम 74
‘रत्नांगीच्या रसोईतून’ झटपट कालवण! 75
शब्दकोडे – उत्तर 76
श्रद्धांजली 77
निखळलेले तारे 78

महाराष्ट्र मंडळ शिकागो

Maharashtra Mandal Chicago Inc.
(Year of Establishment: 1969)
The first Maharashtra Mandal in United States of America, serving the community as non-profit organization

Website:
https://www.mahamandalchicago.org

Email Address for correspondence:
president@mahamandalchicago.org
karyakarini@mahamandalchicago.org

मुखपृष्ठ:
- अमृता जोशी

मुद्रित शोधन:
- डॉ. सुजाता महाजन
- मयूरी जकाते

मांडणी आणि संकलन सहाय्य:
- आशिष नगरकर
- शिप्रा अथणीकर
- मिलिंद साळी

महाराष्ट्र मंडळ शिकागो (MMC) बद्दल काही उल्लेखनीय नोंदी:
It is the first Maharashtra Mandal in the United States of America, serving local community as a non-profit organization, since 1969. It is the proud founder of (BMM) Bruhan Maharashtra Mandal, North America (http://www.bmmonline.org)
It is also initiator of BMM Newsletter – BMM Vrutant (https://bmmonline.org/vrutta-archive)

साहित्य / मजकूर पाठविण्यासाठी संपर्क: rachana@mahamandalchicago.org
rashmichafekar@gmail.com

साहित्य / मजकूर पाठविण्यासाठी सूचना:
- साहित्य लिहिताना मराठी फॉन्ट (उदा. मंगल - Mangal) आणि आकार १० असावा.
- लिखाणात क्रमांक वापरल्यास ते मराठीत लिहावेत (उदा. १..२५ इ.)
- अखेरीस आपले संपूर्ण नाव नमूद करावे.
- आपले साहित्य 'मायक्रोसॉफ्ट वर्ड' किंवा 'गूगल डॉक' मध्ये लिहून पाठवावे.
- साहित्य वरील ईमेल वरतीच पाठवावे.
- ईमेल पाठवताना साहित्य अटॅचमेंट स्वरूपात पाठवणे.
- सोबत आपला फोटो पाठवावा.


MAHARASHTRA MANDAL CHICAGO
महाराष्ट्र मंडळ
शिकागो तर्फे
नविन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा!
2022

अध्यक्षीय

नमस्कार मंडळी!

नवीन वर्ष सुरू झालं आहे. सर्वप्रथम महाराष्ट्र मंडळाच्या २०२२ च्या नव्या कार्यकारिणीच्या वतीने तुम्हा सर्वांना नव्या वर्षाच्या शुभेच्छा देते. हे नवीन वर्षं तुम्हाला सुख-समृद्धीचं, समाधानाचं आणि आरोग्यदायी जावो. नव्या वर्षात तुमच्यासाठी नव्या उत्साहाने, नवनवीन आणि भरगच्च कार्यक्रम करण्यासाठी २०२२ ची कार्यकारिणी सज्ज आहे.

सुरवातीलाच थोडंसं येत्या वर्षाच्या कार्यक्रमांबद्दल सांगते. खरं म्हणजे, या नव्या वर्षी अपेक्षा अशी होती, की करोना व्हायरसची लस (Vaccine) सर्वत्र उपलब्ध असल्यामुळे सामाजिक अंतराची (Social Distancing) बंधनं हळू हळू कमी होतील आणि महाराष्ट्र मंडळाचे कार्यक्रम Online / Virtually करण्याची गरज न रहाता प्रत्यक्ष उपस्थितीत (In Person) करता येतील. परंतु Omicron Variant मुळे आलेली नवी लाट आपल्याला सांगते आहे, की करोना व्हायरसपासून आपली लवकर सुटका होणार नाही. त्यामुळे नाईलाजास्तव प्राप्त परिस्थितीनुसार या वर्षीचा पहिला मकर संक्रांतीचा कार्यक्रम हा Online / Virtually सादर केला जाईल. महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या संकेत स्थळावर (website) या कार्यक्रमाची सविस्तर माहिती उपलब्ध आहे. हा वैविध्यपूर्ण कार्यक्रम यशस्वी होईल अशी आम्हाला खात्री आहे. हा कार्यक्रम पाहण्याच्या संधीचा जरूर लाभ घ्या. उर्वरित वर्षासाठी अपेक्षा अशी आहे, की Omicron Variant मुळे आलेली नवी लाट लवकरच ओसरेल आणि यापुढचे इतर कार्यक्रम, म्हणजे गुढी पाडवा, गणेशोत्सव, दिवाळी, वार्षिक सहल (Picnic), दांडिया/गर्बा, क्रीडा महोत्सव(स्पोर्ट्स) नक्कीच प्रत्यक्ष उपस्थितीत (In Person) होतील.

या नव्या कार्यक्रमात शिकागो परिसरातल्या सर्व सदस्यांना (members) भाग घेता यावा म्हणून महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीच्या व्यवस्थापनात थोडासा बदल करून कार्यकारिणी अधिक विस्तारित केली आहे. विस्तारित कार्यकारी समिती (expanded executive committee) मध्ये उत्तरेच्या आणि दक्षिणेच्या सदस्यांचा कटाक्षाने अंतर्भाव केला आहे. कार्यकारी समितीचे उत्तर आणि दक्षिण अशा दोन्ही बाजूंच्या उपनगरांमधले सदस्य मंडळाचे विविध कट्टे, आणि उपक्रम यांचे संपर्काधिकारी (Liaison) म्हणून काम करतील याची विशेष दक्षता आम्ही घेतो आहोत. या बदलामुळे दक्षिणेबरोबर शिकागो शहराच्या उत्तरेकडील उपनगरातील सदस्यांना कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेणं सोपं होईल.

गेलं वर्ष कोविडमुळे अडचणींचं, आव्हानांचं आणि चिंतेचं गेलं. परंतु कोविडमुळे निर्माण झालेली परिस्थिती हे संकट न मानता, नवे उपक्रम करण्याची संधी आहे असा सकारात्मक दृष्टिकोन समोर ठेवून महाराष्ट्र मंडळाच्या आजवरच्या इतिहासात कधीही न झालेले अनेक नवे उपक्रम (साहित्य कट्टा, अध्यात्मपीठ, आम्ही सारे गवय्ये, इतिहास मंच) आम्ही गेल्या वर्षी चालू केले. तुम्हा सर्वांचा मोठ्या संख्येने सक्रिय सहभाग या उपक्रमांना लाभला आणि ते लोकप्रिय ठरले. हे जुने उपक्रम आम्ही या वर्षीही चालू ठेवूच, पण त्यांच्या यशापासून प्रेरणा घेऊन आम्ही तीन नवीन उपक्रम या वर्षी चालू करणार आहोत. पर्यटन (Tourism) या विषयात रस असणाऱ्यांसाठी 'भ्रमणगाथा' हा नवीन WhatsApp कट्टा लवकरच सुरू होईल. तसंच आरोग्यसंवर्धन हा उद्देश समोर ठेवून 'आरोग्यधाम' हा एक नवा WhattsApp कट्टा आम्ही सुरू करणार आहोत. आर्थिक नियोजनबद्दल माहिती देणारा 'अर्थविचार' हाही कट्टा लवकरच सुरू होईल. या तिन्ही कट्टयांविषयी अधिक माहिती येत्या काही दिवसात आम्ही तुम्हाला देऊ.

सांगण्यासारखी आणखी एक गोष्ट आहे. पुण्यात १८७५ साली न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी सुरू केलेल्या वसंत व्याख्यानमालेपासून प्रेरणा घेऊन शिकागोमध्ये यावर्षीपासून संक्रमण व्याख्यानमाला नावाची अशीच एक व्याख्यानमाला आम्ही आयोजित केली. मा. निलेश ओक, डॉ. सच्चिदानंद शेवडे, डॉ. अभय बंग, गुरुदेव शंकर अभ्यंकर, मा. धनश्रीताई लेले यांसारख्या अत्यंत नावाजलेल्या, जाणकार, विद्वान वक्त्यांच्या विचारांचा लाभ या व्याख्यानमालेमुळे शिकागोकरांना मिळाला.

महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमांचं यश हे तुमचं म्हणजे मंडळाच्या सदस्यांचं यश आहे. मंडळाच्या कार्यक्रमाचं यश अधिक वाढावं यासाठीच्या तुमच्या नवीन कल्पनांचं आम्ही स्वागत करू. महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी प्रयत्न करेलच पण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तुमचा सहभाग आणि आशीर्वाद आवश्यक आहे. गेल्या वर्षीच्या बिकट परिस्थितीमध्येही तुम्ही सर्वांनी सर्व उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन महाराष्ट्र मंडळाला पाठिंबा दिला, त्याबद्दल तुमचे मनःपूर्वक आभार मानते आणि महाराष्ट्र मंडळावरचा तुमचा स्नेह, लोभ या नव्या वर्षीही राहावा, किंबहुना अधिक वृद्धिंगत व्हावा अशी अपेक्षा करते आणि माझं मनोगत इथेच पूर्ण करते.

धन्यवाद!

लवकरच प्रत्यक्ष भेट होईल, या आशेसह,

स्नेहांकित
उल्का जोशी- नगरकर
अध्यक्ष,
महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२२

संपादकीय

बघता बघता २०२२ उजाडलं.

दिवस काय भराभर पुढे सरकतात नाही? पण काहीही म्हणा, आपण कुठल्या ना कुठल्या कामामध्ये व्यस्त असलो, ना की हे दिवस छान जातात. आता माझंच बघा ना, मागच्या वर्षभरात ‘रचना’ मासिकाचं काम करताना आणि त्यामधलं तुमचं उत्तमोत्तम लिखाण वाचताना वेळ कसा गेला ते मला कळलंच नाही. तुमच्यातल्या लेखकांनी, कवींनी आपल्या नवीन नवीन कलाकृतींनी ‘रचना’ मासिकाचा प्रत्येक अंक खरंच सजवला.

मागच्या वर्षीच्या तुमच्या सहकार्याने आणि पाठिंब्याने, आपण सर्वांनी मिळून ‘रचना’चे काही विक्रमही केले आणि २०२१ हे वर्ष ‘रचना’ने गाजवले असं म्हणायला काहीच हरकत नाही.

तसाच पाठिंबा, शुभाशीर्वाद आमच्या टीमच्या पाठीशी ह्या वर्षीही असतील ह्याची मला खात्री आहे.

माझ्यावर पुन्हा एकदा ‘रचना’च्या संपादक पदाची जबाबदारी टाकून महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या २०२२च्या अध्यक्षा, उल्का नगरकर ह्यांनी जो विश्वास दाखवला, त्याबद्दल त्यांचे मनापासून धन्यवाद.

आणि हे काम करताना आणि ह्या वर्षीचे ‘रचना’चे अंक तुमच्यासमोर ठेवताना, टीम रचनाचे आमचे खंदे सहकारी, सुजाता महाजन, मयूरी जकाते, मिलिंद साळी, शिप्रा अथणीकर, प्रसाद अथणीकर, अमृता जोशी आणि मितेश देशपांडे ह्यांचं मोलाचं सहकार्य ह्यात असणारच आहे. त्यांच्या मदतीशिवाय ही जबाबदारी स्वीकारणं मला खरंच कठीण गेलं असतं. ह्या सर्वांचेही मनापासून आभार.

तुम्हां सर्वांना टीम रचनातर्फे नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! हे नवीन वर्ष सर्वांना भरभराटीचं, सुखसमाधानाचं आणि करोनाविरहित जावो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

कळावे,

लोभ आहेच तो वाढावा,

रश्मी चाफेकर
संपादक, ‘रचना’

कार्यकारिणी

President: Ulka Nagarkar — *president@mahamandalchicago.org*

Chicagoland resident for 16 years. President of MMC 2021. Volunteered for BMM 2011 NAPC committee, Rachana editor in year 2015, 2020, Smarnika lead in GJC 2019. Enjoys coordinating community enrichment efforts. Looking forward to a memorable and exciting year ahead. Let's all work together for the betterment of our community.

Vice President: Prasad Athanikar — *karyakarini@mahamandalchicago.org*

Chicagoland resident for over 15 years. Volunteering for Maharashtra/Marathi Mandals in USA over the past several years while leading Cybergaming, Sports, Picnic, Maza News, IT, Itihas Manch, Facility and Lezim teams in MMC. Also, led Over Facility Team during MMC's Golden Jubilee Celebrations in 2019. Elected as Vice President in 2021 and got re-elected in 2022. Looking forward to working with the energetic 2022 team and bringing together the community for high quality programs and events. Play Cricket, Badminton, Volleyball and many other sports.

Vice President: Rashmi Chafekar — *karyakarini@mahamandalchicago.org*

Chicagoland resident for over 29 years. Vice President in 2021. Got re-elected as Vice President for 2022. Has participated in various programs over the years. Have written articles for Rachana. Loves to write and listen to music.

Treasurer: Mitesh Deshpande — *treasurer@mahamandalchicago.org*

Chicagoland resident for more than 20 years. Has participated in various programs over the last few years. Enjoys listening to different genres of music, as well as singing and an avid cricket fan.

Secretary: Chetan Rege — *karyakarini@mahamandalchicago.org*

Chicago resident for 15+ years. Bibliophile. Volunteered for various MMC activities - Admin of Itihas Manch and Adhyatma Peeth groups; Rachana Editor in 2019; Teacher at Chicago Marathi Vidyamandir. Directed and coordinated for several performances. Aiming to preserve our incredible Indian heritage and build a solid MMC community.



Board of Director: Madhav Gogawale — *karyakarini@mahamandalchicago.org*

Chicagoland resident for 27 years. Enjoyed working as EC member of Maharashtra Mandals in Indiana and Illinois, served as Marathi Shala teacher in the late 1990s. Actively participated in several activities of MMC in 2021. Looking forward to very exciting and fun filled year ahead.

Board of Director: Nameeta Vedak — *karyakarini@mahamandalchicago.org*

I have been a Chicago resident for over 35 years and have been actively involved in Chicago Maharashtra Mandal since 1987 both as a foot soldier and as a member of various executive committees. I also served as a vice president in 1999. I was very active in Bollywood and was a lead actor in bunch of films before coming to US. I have also participated in various Bombay Television/Doordarshan plays and performed on professional stage in Mumbai. I am recipient of a few awards for my performances in both film and stage media. I am very much a people person and love to help wherever and whenever I can. I am looking forward to working with the 2022 MMC team to bring high quality programs to the community.

Board of Director: Kashmira Magar — *karyakarini@mahamandalchicago.org*

Chicagoland Resident for 21 years. I have been associated with Maharashtra Mandal Chicago for the last 19 years. I was also on the 2021 MMC Board of Directors and am once again excited to lead the Youth and Decoration team to contribute to MMC 2022. I enjoy music, art and architecture.

Board of Director: Deepali Sawant — *karyakarini@mahamandalchicago.org*

Resident of the Chicagoland area for 23+ years. Involved in MMC dance team for 6 years. Excited and looking forward to leading the Parampara team, Flyer team and Graduation team to bring the community together. Looking forward to a fun filled MMC 2022

Board of Director: Urmila Damle — *karyakarini@mahamandalchicago.org*

Chicagoland resident for over 6 years. Participated and actively volunteered in various activities in Maharashtra Mandal Chicago since 2016. I have a passion for spirituality, music, dance, reading and cooking. I look forward to an amazing year ahead

Board of Director: Swati Kukian | *karyakarini@mahamandalchicago.org*

I have been in USA since 2003. My educational background is MBA Finance. I am working in the finance sector as an Analyst and in my leisure time, I love cooking and dancing

Board of Director: Sameer Bongale | *karyakarini@mahamandalchicago.org*

Chicagoland resident for 7 years. Actively involved and volunteered in Chicago Maharashtra Mandal. I like music, designing and to work for our community. Looking forward to fun filled MMC 2022

Board of Director: Prajakta Joshi | *karyakarini@mahamandalchicago.org*

I live in Chicago area since 2015. Active member of Maharashtra Mandal Chicago since 2016. I have been helping the stage and props team from quite some time. I have prepared props for the various MMC events. This year, I am very excited to lead the stage and props team to contribute to MMC 2022

Board of Director: Archana Bhide | *karyakarini@mahamandalchicago.org*

Chicago resident for last 17 years. Volunteered for MMC over many years. I enjoy coordinating and organizing community events. Looking forward to work with the 2022 team and bring the community closer

Board of Director: Sanjeev Kulkarni | *karyakarini@mahamandalchicago.org*

Resident of Chicago land for last 7 years and actively participating and supporting skits as part of programs in MMC. Excited and looking forward to supporting our MMC in 2021 to make our community stronger and grow in and around Chicago!

MMC Trustees

समीर सावंत

वैशाली राजे

पंकज अकोलकर

रामदास थत्ते

धनंजय काळे

MMC Investment Advisors

संदीप बाग

मिलिंद जोगळेकर

योगेश गायकर

बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी

विद्या जोशी (President)

नितीन जोशी (Trustee)

MMC शाळा कार्यकारिणी

Coordinator

सुलक्षणा कुलकर्णी

Trustee

विद्या जोशी

Naperville PoC

वैदेही देशपांडे

Schaumburg PoC

संज्योत बोरकर

Treasurer

प्रसाद खरे

MMC 2022 Volunteers

Amit Bodhani
Amruta Joshi
Anagha Deshpande
Aniket Sawant
Aniruddha Damle
Anuradha Kelkar
Aparna Talloo
Arati Khot
Archana Bhide
Ashish Nagarkar
Ashwini Kunte
Avani Deshpande
Chetan Rege
Deepali Sawant
Dipti Govardhan
Kashmira Magar
Kavita Kulkarni
Kavita Purav
Ketki Deshpande
Leena Vaidya
Madhav Gogawale
Manasi Thatte
Mandar Joglekar
Manoj Joshi
Milind Sali
Mitesh Deshpande
Nameeta Vedak
Narasimha Kamath
Neelima Andurkar
Nilesh Joshi
Parth Deshpande
Prajakta Joshi
Prasad Athanikar
Priya Patankar
Rajesh Hatkar
Rashmi Chafekar
Rasika Bandekar
Rekha Deodhar
Sameer Bongale
Sameer Kulkarni
Sara Bongale
Sawankumar Dumbre Patil
Shalaka Palkar Rege
Sheetal Deshpande
Shilpa Deshpande
Shipra Athanikar
Shraddha Bhat
Shree Chafekar
Shweta Harankhedkar
Shweta Kulkarni
Simple Palekar
Sujata Mahajan
Swati Kukian
Swati Lakhe
Tejaswini Joshi
Ulka Nagarkar
Urmila Damle
Vaishali Belsare
Vikas Tarade
Vishal Kale
Yogita Landge

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२२ Logo

SPONSOR WALL

We wish to thank following people who have purchased Sponsorship Packages for 2022.

Individual Plus

- Sheetal Sawant
- Gauri Kulkarni
- Aditi Shirgaokar
- Hemlata Limaye
- Sunita Talati
- Sujata Mahajan
- Asha Kharwadkar
- Prakash Anturkar
- Manik Nambiar

Family Plus

- Ketan Hattalli
- Shilpa Deshpande
- Prasad Athanikar
- Mitesh Deshpande
- Vidya Joshi
- Manisha Pandit

Couple Plus

- Nikhil Javeri
- Deepak Bakane
- Mayuri Jakate
- Vishal Dahalkar
- Leena Karkhanis
- Kashmira Magar
- Deepali Sawant
- Sneha Kulkarni

Couple Silver Sponsorships

- Hemlata Sakhardande
- Rashmi Chafekar
- Nandini Vishwasrao

Life

- Sheetal Chitale
- Anand Deshpande
- Rajesh Hatkar

Life plus upgrades

- Chandra Vedak
- Ulka Nagarkar
- Chetan Rege
- Madhav Gogawale
- Geetaram Dangat
- Vrinda Pandav

Life Silver Sponsorships/Upgrades

- Ashok Lele
- Niteen Joshi

संक्रांत २०२२ कार्यक्रम

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२२
सादर करीत आहे,

‘संक्रमण व्याख्यानमाला’

प्रमुख व्याख्यानकार

व्याख्यान १ - **विषय: ‘द्रौपदी वस्त्रहरण खरंच झाले का?’,**
वक्ते: श्री. निलेश ओक
वेळ: शनिवार १५ जानेवारी २०२२ रात्री ७ ते ९ (शिकागो प्रमाणवेळ)

व्याख्यान २ - **विषय: ‘अपरिचित रामायण’,**
वक्ते: डॉ.सच्चिदानंद सुरेश शेवडे
वेळ: रविवार १६ जानेवारी २०२२ रात्री ७ ते ९ (शिकागो प्रमाणवेळ)

व्याख्यान ३ - **विषय: ‘जीवनासाठी शिक्षण कसे देता येईल’,**
वक्ते: डॉ. अभय बंग
वेळ: शुक्रवार २१ जानेवारी २०२२ रात्री ८ ते १० (शिकागो प्रमाणवेळ)

व्याख्यान ४ - **विषय: ‘स्वामी विवेकानंदांचा शिकागोमधील सर्वधर्म परिषदेतील दिग्विजय’,** **वक्ते:** विद्यावाचस्पती गुरुदेव श्री. शंकर अभ्यंकर
वेळ: शनिवार २२ जानेवारी २०२२ रात्री ७ ते ९ (शिकागो प्रमाणवेळ)

व्याख्यान ५ - **विषय: ‘मेघदूत रसास्वाद’,**
वक्त्या: सौ. धनश्री लेले
वेळ: रविवार २३ जानेवारी २०२२ रात्री ७ ते ९ (शिकागो प्रमाणवेळ)

प्रस्तुत कार्यक्रमांचा आनंद ऑनलाइन लिंकद्वारे रसिकप्रेक्षकांना घेता येईल. तिकीट बुक करण्याकरिता महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या खालील लिंकला लवकरात लवकर भेट द्या.
https://www.mahamandalchicago.org/booking/

अध्यक्षीय चष्म्यातून

नमस्कार मंडळी,

नवीन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा. मनात नव्या आशा-आकांक्षांचे तोरण आणि डोळ्यांत स्वप्नांचे दिवे घेऊन पुन्हा एक नवं कोरं वर्ष आपल्या वाट्याला आलं आहे.

सर्वप्रथम उल्का नगरकर आणि टीमचे मनःपूर्वक अभिनंदन. 'अध्यक्षीय चष्म्यातून' हे सदर लिहिताना डोळ्यासमोरून सरकते, ती गेल्या दोन वर्षांत झालेली स्थितंतरे आणि न्यू जर्सीच्या अधिवेशनासाठी चाललेली अथक मेहनत. अनेक अर्थांनी हे वर्ष महत्त्वाचे ठरणार आहे. विशेषतः ज्याची आपण दर दोन वर्षांनी आतुरतेने वाट बघत असतो, ते बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन यावेळी तीन वर्षांनंतर होणार आहे. ११ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट रोजी अटलांटिक सिटी न्यू जर्सी येथे होणाऱ्या या अधिवेशनाचे आपणा सर्वांना हे आग्रहाचे निमंत्रण!

बृ. म. मं. अधिवेशनाचे वर्णन काय करावे! उत्तर अमेरिकेतील जवळजवळ ५००० प्रेक्षकांच्या उपस्थितीत रंगलेल्या भेटीगाठी, संवाद, सांस्कृतिक कार्यक्रम, खाद्यपदार्थांची रेलचेल, तारे तारकांची उपस्थिती, भरघोस बक्षिसे अशी बहार या ठिकाणी अनुभवायला मिळते. यावेळीही अनेक नवनवीन कल्पनांसह ती अनुभवायला मिळेल.

डे-०(Day-0) पासून सुरू होणाऱ्या या अधिवेशनात पहिल्या दिवशी बिझकॉन (business conference), पर्यायी औषधोपचार अर्थात योग, होमियोपॅथी, आयुर्वेदिक, रेकी, प्राणिक योग यांवरील चर्चा, 'उत्तररंग', रेशीमगाठी (BMMचे वधूवरसूचक संकेतस्थळ शैक्षणिक सेमिनार) यांचे कार्यक्रम त्याचप्रमाणे भारत आणि अमेरिकन विद्यापीठांशी सबंधित शैक्षणिक चर्चासत्रे आयोजित केली आहेत.

आपल्या आवडत्या कलाकारांची उपस्थिती हे तर BMM अधिवेशनाचे खास आकर्षण आहे. मराठी नाट्य आणि संगीत क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती यावेळीही आपल्याला लाभणार आहे. त्याचप्रमाणे सचिन खेडेकर, सोनाली कुलकर्णी, मुक्ता बर्वे या आपल्या आवडत्या कलाकारांचे कार्यक्रम बघण्याची संधी रसिकांना लाभणार आहे. कलाकारांच्या या मंदियाळीत उ. अमेरिकेतील २५ शहरातील स्थानिक कलाकारांची धमाल सादरीकरणेही आहेत. नृत्य-नाट्य-संगीत आणि ढोल ताशा स्पर्धाही आपल्याला अनुभवायला मिळतील. या सर्वांवर खडीसाखर म्हणजे सेलिब्रिटी शेफ विष्णू मनोहर यांची संपूर्ण अधिवेशनाला उपस्थिती आणि प्रत्यक्ष त्यांच्या हातच्या एकाहून एक सरस अशा पाककृती आपल्याला चाखायला मिळणार आहेत. खरंच, सुख म्हणजे याहून अधिक काय!

जगात कुठेही असलो मनातलं मराठीपण कायम सोबत असतंच. जगाच्या विविध रंगांत रंगूनही स्वतःचं वेगळेपण जपणारं मनातलं मराठीपण...वेगवेगळ्या वादयांच्या तालावर झुलतानाच ढोलताशाचा गजर जपणारं मनातलं मराठीपण..आपल्या अस्तित्वाचा सोहळा मनातल्या मनात रोज अनुभवणारं मनातलं मराठीपण !

'सोहळा अस्तित्वाचा' हे ब्रीदवाक्य घेऊन येणाऱ्या २०२२ च्या अधिवेशनाच्या निमित्तानं हा मनातला सोहळा प्रत्यक्षात अनुभवयला मिळणार ही एक पर्वणीच. मराठीच्या या वारीत आपणही सहभागी व्हावे आणि या ब्रीदवाक्याला साजेसे असे भव्य संगीतमय

नृत्यनाट्य 'ऐका रंगदेवते तुझी कहाणी' सादर करणार आहेत शिकागोतील कलाकार. ८० ते ९० सहभागी कलावंतांचा ताफा असलेल्या या महानाट्यामध्ये एकाच कथासूत्रात बांधलेल्या नाट्य,नृत्य,संगीत अशा वेगवेगळ्या कलाप्रकारांचा आविष्कार असेल. या भव्यतेला अधिकच अर्थपूर्ण करणाऱ्या LED projector सारख्या तांत्रिक बाबी हेदेखील या प्रयोगाचे खास वैशिष्ट्यच असेल. अस्सल मराठी मातीतला आणि भाषेतला हा 'ब्रॉडवे शो' प्रेक्षकांची मने जिंकून घेण्यात नक्कीच यशस्वी होईल यात शंका नाही.

हे सगळे आयोजन नेटके व्हावे म्हणून गेल्या दोन वर्षांपासून BCC चे (BMM convention टीम) विद्या जोशी, सोना भिडे, कोमल चौक्कर, मोहित चिटणीस, हेमा रचमाले तसेच BMM न्यू जर्सी, अटलांटिक सिटीचे प्रशांत कोल्हटकर, अमर उरेकर, विहार देशपांडे, पुनीत मराठे यांचे अथक प्रयत्न सुरू आहेत.

तर मंडळी, परदेशात रंगणाऱ्या या मराठमोळ्या उत्सवाची जय्यत तयारी झाली आहे. आता वाट आहे ती आपल्या आगमनाची. आपल्या कुटुंब आणि मित्रपरिवारासह अवश्य येण्याचे करावे.

कळावे लोभ असावा.

बृ. म. मं. अध्यक्ष
विद्या जोशी

गुळाची पोळी

अगं मैत्रिणी काय केलंस हे? मला तू गुळाची पोळी आणून दिलीस? आता बघ काय झालं ते!

काही दिवसांपूर्वी माझ्या एका मैत्रिणीने मला आवडते म्हणून मुद्दाम गुळाची पोळी आणून दिली, सॉरी चुकलं, गुळाच्या पोळ्या आणून दिल्या आणि इथेच सगळी गडबड झाली. काय गडबड झाली हे तुम्हाला कळण्याकरता थोडी पार्श्वभूमी देणं गरजेचं आहे.

तर, मी आणि गुळाची पोळी, माझ्या लहानपणापासूनच सख्या मैत्रिणी! त्यातून आई सुग्रण! त्यामुळे तर , ही पोळी आणि मी, आम्ही दोघी फार थोड्या वेळात अगदी घट्ट मैत्रीच्या बंधनात बांधल्या गेलो. हे बंधन बांधलं जायला आणखीन एक कारण म्हणजे माझा वाढदिवस डिसेंबरमधला आणि गुळाची पोळी हीपण त्याच सिझनमधली, त्यामुळे माझा वाढदिवस आणि गुळाची पोळी हे आमच्या घरातलं समीकरणच बनून गेलं होतं. तुम्हाला खरं सांगते, आई अशी त्या सुंदर, सुबक दिसणाऱ्या गुळाच्या पोळ्या डब्यात भरून ठेवायची आणि मला कशी कुणास ठाऊक सतत भूक लागायची (अर्थात ह्याचं कारण म्हणजे मी भूक लागली असं म्हटलं, की आईचं उत्तर काय असेल हे माहीतच असायचं). आणि मग काय, मी, पोळी आणि त्यावरचं ते साजूक तूप! अगदी गट्टी!!आणि हो, प्रत्येक वेळी मी गुळाची पोळी तितक्याच आवडीनं खायची! ह्याला म्हणतात प्रेम!

तर माझ्या मैत्रिणीने गुळाच्या पोळ्यांचा डबा आणून दिला आणि हृदयातली तार पुन्हा एकदा छेडली गेली. आता तुम्ही म्हणाल, की तू असं खूप दिवसांनी गुळाची पोळी बघितल्यासारखं काय बोलतेस? अहो, तसंच झालं होतं कारण मला गुळाची पोळी इतकी आवडत असूनही मी स्वतः ती करत नाही कारण मी जर घरी गुळाच्या पोळ्या केल्या तर त्या घरात बाकी कोणालाही खायला मिळणार नाहीत आणि मला बाळसं धरेल त्याला जबाबदार कोण मग? म्हणूनच मी ते टाळते. असो!

तर, ह्या माझ्या छानशा मैत्रिणीने मला पोळ्या आणून दिल्या, मी तो डबा किचन कांऊटरवर ठेवला आणि लगेच त्याला हात लावायचा नाही असं ठरवून मी जरा लांब जायला लागले, तेवढ्यात माझ्यासमोरचा तो डबा हलायला लागला आणि त्या गुळाच्या पोळ्या माझ्या पोटात जाण्यासाठी माझ्या विनवण्या करायला लागल्या. मी नाही म्हणायचा निष्फळ प्रयत्न करत होते पण माझ्या अतिशय जुन्या मैत्रिणीचं आणि पोळ्या आणून देणाऱ्या मैत्रिणीचं मन मोडणं हे माझ्या सुसंस्कृत मनाला पटलं नाही आणि हळूच अर्धी पोळी पोटात गेली. हो, अगदी तुपाच्या साथीनं. नंतर मी डबा बाजूला ठेवला खरा, पण तोही जरा घरातल्यांचा विचार करून आणि लाजेकाजेस्तवच. त्यामुळे ह्यावेळी मुलीनेपण पोळी खाल्ली आणि तिलाही ती आवडली. आता तिचंही जर माझ्यासारखंच त्या गुळाच्या पोळीबरोबर नातं जुळलं, तर मात्र मला त्या पोळ्या करण्याशिवाय पर्याय राहणार नाही आणि मग त्यावेळी माझ्या गुटगुटीतपणाचा दोष माझ्यावर येणार नाही.

असो! पण एक मात्र खरं, की ह्यावेळेला मला गुळाच्या पोळ्या खाव्याच लागणार कारण मैत्रिणीचे कष्ट आणि गुळाच्या पोळ्यांशी असलेला ऋणानुबंध ह्याकडे मी दुर्लक्ष करू शकत नाही आणि ह्या दोन्ही गोष्टींना न्याय देणं, ही माझी जबाबदारी आहे.

आता मी लिहिणं थांबवते कारण किचनमधून पुन्हा आवाज यायला लागले आहेत आणि मला तिकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

रश्मी चाफेकर

संक्रांत मेळावा

संक्रांत आली संक्रांत आली
नवीन वर्ष लागताच मने मोहरली
काळ्या रंगाच्या उबेत थंडीही पळाली
हलव्याच्या खडीची काळी वस्त्रे
घडीतून बाहेर आली

संक्रांतीची देवाण-घेवाण
नको त्याला रूप तोलामोलाचं
तिळगुळाच्या दाण्यादाण्यात
नातं असू द्या प्रेमाचं

प्रेम वाटा प्रेम मिळवा
संदेश मनाचा असावा
जीवनाच्या प्रांगणात
सुखाचा गारवा मिळावा

थंडीच्या शिरशिरीने
काटा येऊ द्या हलव्याला
तिळातिळावर पाक चढे
गोडी देईल जगण्याला

तिळगुळाच्या गोडीने
नववर्षाचे जीवन व्हावे समृद्ध
मनातले प्रेम आज
झाले आहे असे शब्दबद्ध

मैत्रीचा संदेश - संक्रांत

संक्रांतीचा सण आला
तिळगुळाचा कण बोलला - ध्रु

करा देवाण-घेवाण
ठेवा मैत्रीची जाण
हा संदेश सांगून गेला
संक्रांतीचा सण आला आला - १

नव्या सुनांचा सण आगळा
देहा सजवी चंद्रकळा
तिळवणाची नवी-नवी झळा
हलवा नटवी गोठ पाटल्या
संक्रांतीचा सण आला - २

नव्या बाळाची हो बोरन्हाण
छोट्या मित्रांची हो दाणादाण
हलवा बोरे ऊस चॉकलेट
बाळा न्हाऊ घाला झटपट
संक्रांतीचा सण आला - ३

थंडीची आली शिरशिरी
काटा घरी तिळाचे वरी
गोड रंगित हलवा झाला
संक्रांतीचा सण आला - ४

तिळगुळाचा कण बोलला
करा देवाण-घेवाण
ठेवा मैत्रीची जाण
हा संदेश सांगून गेला - ५

नीला प्र जोशी

रचना

संपादक

रश्मी चाफेकर

मुद्रित शोधन (मराठी)

डॉ. सुजाता महाजन

मुद्रित शोधन (इंग्रजी)

मयूरी जकाते

मुखपृष्ठ

अमृता जोशी

मुखपृष्ठ, मांडणी आणि संकलन सहाय्य

आशिष नगरकर

शिप्रा अथणीकर

मिलिंद साळी

Taming the Stress Tiger

इमोशनल इटिंग हा प्रकार प्रत्येक वैद्यकीय शाळेच्या विद्यार्थ्यांना चांगलाच परिचयाचा आहे आणि ग्रॅन्ट मेडिकल स्कूलच्या विद्यार्थ्यांना तर ती एक चांगली excuse होती. ग्रांट मेडिकलच्या अवती-भोवती चमचमीत खाण्यासाठी भरपूर चॉइसेस होत्या. खाऊगल्ली काय, दिल्ली दरबार काय, गुलशन-ए-इराण काय किंवा रस्त्यावरचे धाबे काय- त्यावेळी आयुष्यातला कुठचाही stress पचवण्यासाठी आम्ही या ठिकाणी छापा मारायचो - ते ही सकाळी एक-दोन वाजता. अर्थात मेडिकल स्कूलमध्ये शिकलेल्या hygiene चं ज्ञान ओल्ड होस्टेलच्या खोलीतच ठेवायला लागायचं. त्या ज्ञानाचा आणि जिभेच्या चोचल्यांचा काही संबंध नसायचा.

MBBS चं दुसरं वर्ष होतं बहुधा. पॅथॉलॉजी आणि फार्माकॉलॉजीचा अभ्यास करून करून मेंदूचा खिमा झाला होता. त्यामुळे मला आणि माझ्या मित्राला (इंदर) भेंडी बाजारच्या बैदा खटाखट आणि लस्सीची (ब्लॉटींग पेपर स्पेसिअल!) फारच तल्लफ आली. रात्रीचे दोन वाजले होते. काली-पिवळी मारून तिथे पोहोचलो आणि बैदा खटाखटचा पूर्ण आस्वाद घेतला.

चोवीस तास गेले असतील बहुधा. बैदा खटाखटने पहिल्यांदा पोटात हळूहळू खटखटायला चालू केलं. एक-दोन तासाने तर पोटामध्ये बॉम्बस्फोट चालू झाले. त्याच्या नंतर पोटामधली सगळी आतडी उसाच्या गुऱ्हाळामधून जातायत असं वाटायला लागलं. पुढचं मी काही सांगत नाही, कारण तुम्हाला सुद्धा तो अनुभव पावभाजी किंवा पानातली कुल्फी खाऊन केव्हातरी आलाच असणार. पण खाऊगल्लीत जायचं म्हणजे Disney च्या थीम पार्क मध्ये जाण्यासारखं आहे. rollercoaster च्या थ्रिलबरोबर गुरुत्वाकर्षणाशी युद्ध असतंच की. तेव्हा त्याच्या आफ्टरशॉकसाठी मनाची पूर्ण तयारी होती. पण त्यानंतर महिनाभर देहाचं काय झालं त्याची मात्र मनाची अजिबात तयारी नव्हती. देहाच्या इमारतीचे एक एक स्तंभ हळूहळू कोसळू लागले. शरीरातील सर्व ऊर्जा (energy) हळूहळू कमी होऊ लागली. भूकतहान हरवून गेली. दहा पावले चाललो तर एक मैल चालण्याचा त्रास होऊ लागला. दिवसा वीस वीस तास झोपायला लागलो. मेडिकल स्टुडंट्स म्हणजे अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणाऱ्या नवऱ्यासारखे असतात. मुंडावळ्या लावून बोहल्यावरती उभे राहायला तयार असतात. माझी मित्रमंडळीही तशीच. अर्ध्या ज्ञानाने पिवळे झालेले माझे मित्र दर तासाला मला एक नवेनवे diagnosis देऊ लागले. पुष्कळ blood-test सुद्धा झाल्या पण सगळ्या नॉर्मल. तरीही माझ्या मनाची ग्लानी जायला तयार नव्हती. का माहीत नाही, पण माझ्या शारीरिक आजाराने माझ्या मानसिक प्रवृत्तीचा पूर्ण clean bold करून टाकला होता. My body had hijacked my mind.

हा अनुभव of course आपल्याला खरं तर आयुष्यात वारंवार येत असतो. आधुनिक शास्त्रज्ञांनी शरीर आणि मनाच्या संबंधावर बरेच संशोधन करण्याआधीच मानव जातीला या संबंधाची कुणकुण भासली होती. शरीर आणि मन यामध्ये एक सतत dialogue चालू असतो अशी एक अंतर्ज्ञानी शंका होती. त्यामुळे आपल्या भाषेतही त्याचा परिणाम दिसतो. आपण ताप, मळमळ, थकवा अशा दैहिक संवेदनेचे मानसिक उदासीनते बरोबरचे नाते "मला एकदम ग्लानी आली आहे" किंवा "I am not 'feel'ing good" म्हणून बोलून दाखवतो.

खरं तर म्हणजे पूर्वआधुनिक शास्त्राने मनाचा आणि देहाचा हा संबंध केव्हाच ओळखला होता. प्राचीन आयुर्वेदिक धन्वंतरींचा असा विश्वास होता, की मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी शरीरातील तीन द्रवपदार्थांचा समतोलपणा असायला हवा: वात, पित्त आणि कफ. आयुर्वेदिक शास्त्रानुसार या जगातील सर्व

गोष्टी आणि जीवाणूमध्ये ऊर्जा (energy) असते. त्या ऊर्जेचे पांच घटक असतात - अंतरिक्ष, हवा, अग्नी, जल आणि पृथ्वी. या सार्वत्रिक ऊर्जा आपल्या शरीरामध्ये वात, पित्त आणि कफ या द्रव्यपदार्थमार्गे व्यक्त होतात. त्यांचा समतोलपणा शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी महत्वाचा असतो. प्राचीन काळी, रोमन आणि ग्रीक धन्वंतरींनी सुद्धा अशाच प्रकारच्या योजना सादर केल्या होत्या.

पण सतराव्या शतकातला फ्रेंच तत्त्वज्ञानी आणि गणितज्ञ रिने देकार्तने या सर्व प्राचीन ज्ञानाला सुरुंग लावला.

त्याचा विचार असा होता, की या सर्व अंधश्रद्धेमुळेच धार्मिक युद्धं सुरू होतात. त्याला प्रत्युत्तर म्हणून त्याने बुद्धिवादाचे (rationalism) बीज पेरले. ही rationalism ची कल्पना आधुनिक शास्त्राचा पाया मानली जाते. पण त्या कल्पनेनेच मन आणि शरीर या मधल्या संबंधाच्या कल्पनेला चेकमेट केला. देकार्तचा असा ठाम विचार होता, की जे डोळ्यांनी स्पष्ट दिसते तेच सत्य. बाकी सर्व अंध्दश्रध्दा. त्यामुळे शास्त्रज्ञांचा, शरीराचा आणि रहस्यमय पण क्षणभंगुर अशा भावनांचा काही सम्बन्ध असू शकतो; यावरचा विश्वासच गेला.

आपल्या शरीराच्या वागणुकीमध्ये आणि भावनांमध्ये काही संबंध असू शकतो हा विचार शास्त्रीय समुदायात जवळ जवळ तीन शतके निषिद्ध मानला गेला. एका कट्टर विचाराविरोधाच्या युद्धात देकार्तने अनावधानाने दुसऱ्या कट्टर विचाराला जन्म दिला. त्या विचाराने आत्ता आता पर्यंत scientific community ला पूर्ण मोहित केले होते. पण प्रत्येक विचाराचं आयुष्य बहुधा साम्राज्यासारखं असावं. Every empire must fall, and every dominant thought must lose its grip on society over time. देकार्तच्या विचारांचेही तेच झाले. आणि त्याला कारण होता, ऑस्ट्रियन-कॅनेडियन फिसिओलॉजिस्ट हांस सेल (Hans Seyle).

डॉ. हांस सेल हा अत्यंत प्रतिभाशाली आणि हुशार शास्त्रज्ञ होता. त्यांचा जन्म १९०७ साली व्हिएन्ना, ऑस्ट्रियामध्ये झाला. वयाच्या चार वर्षाच्या आधीच त्याचे चार भाषांवर प्रभुत्व होते. त्यांचे वडील ह्यूगो सेल ऑस्ट्रो-हंगेरीअन इंपिरियल आर्मीमध्ये surgeon होते. त्यांच्या आधीच्या चार पिढ्या पण surgeon होत्या. आर्मीनंतर त्यांनी स्वतःची प्रॅक्टिस चालू केली आणि हान्सची आई त्या प्रॅक्टिसची प्रशासक होती. हान्स जेव्हा प्राग विश्वविद्यालयातून वैद्यकीय परीक्षा पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला त्यावेळी सर्वांना वाटले, की तो पण surgeon होणार, पण त्याचा कल होता संशोधनाकडे.

वैद्यकीय शाळेत दुसऱ्या वर्षी पहिल्यांदाच विद्यार्थांना रुग्णांबरोबर भेटायला मिळतं. या रुग्णांबरोबर संवाद करताना हान्सने जे निरीक्षण केलं ते त्याआधी कोणीही केलं नव्हतं. त्याच निरीक्षण असं होतं, की रोग कुठचाही असो पण सर्व रुग्णांना काही लक्षणे common असतात - मानसिक आणि शारीरिक ग्लानी, भूक नसणे, काही काम करण्याची किंवा आवडीच्या गोष्टी करण्याची इच्छा निघून जाणे, वगैरे (म्हणजे बैदा खटखटने माझे केले तेच!). तत्कालीन विचारप्रक्रिया अशी होती, की प्रत्येक रोगाचे विशिष्ट संकेत (signs) आणि लक्षणे (symptoms) असतात आणि डॉक्टर्सनी त्याकडेच लक्ष ठेवावं, म्हणजे diagnosis बरोबर होईल. त्यामुळे हान्सने निरीक्षण केलेल्या या गोष्टीवर बाकी कुणाचे याआधी लक्ष गेले नव्हते.

हान्सने त्याचे काम कॅनडामध्ये चालू ठेवले आणि १९४० साली General Adaptation Syndrome असा सिद्धांत प्रस्तुत केला. या सिद्धांतानुसार stress झाल्यावर माणूस तीन टप्प्यातून जातो १) चेतावणी टप्पा (warning phase) २) प्रतिकार टप्पा (resistance phase) ३) थकवा टप्पा (exhaustion phase). हान्सच्या या सिद्धांतामुळे त्याला जगभर प्रसिद्धी मिळाली आणि १९४९ मध्ये त्यांना नोबेल प्राईझसाठी nominate केले गेले. त्यांना आणखी १७ वेळा त्यासाठी

nominate केले गेले पण दुर्दैवाने हान्सला नोबेल प्राईझ केव्हाच दिले गेले नाही.

हांसचे काम बऱ्याच संशोधकांनी पुढे चालू ठेवले. त्यापैकी एक आहेत डॉ. इस्थर स्टर्नबर्ग. त्या सध्या University of Arizona च्या Andrew Weil Institute of Integrative Medicine मध्ये Research Director आहेत. त्यांनी आपल्या संशोधनामधून दाखवले, की मानसिक आणि शारीरिक स्ट्रेसमुळे रोगप्रतिकार प्रणाली वर (immune system) प्रतिकूल परिणाम होतो. This was groundbreaking research. त्यांनी त्यापुढे हे सुद्धा दाखवले, की immune system कमकुवत झाली तर त्याचा भावनेवर सुद्धा खूप प्रतिकूल परिणाम होतो. त्यांच्या संशोधनाप्रमाणे असं समजलं, की रोगप्रतिकार प्रणालीने (immune system) उत्पादित केलेले रेणू रक्तवाहिन्यांमधून मेंदूकडे पोहोचतात आणि तेथे त्यांचा भावनांवर परिणाम होतो. डॉ. स्टर्नबर्गच्या पुढच्या संशोधनामध्ये असंही सिद्ध झालं, की स्मृती (memory), भावना (emotions) आणि तणाव (stress) या तीन गोष्टींमध्ये फार दृढ संबंध आहे.

ज्याप्रमाणे स्मृती (memories) आपल्या वर्तमान अनुभवांचे अर्थ बदलतात तसंच शारीरिक आणि मानसिक घटक ठरवतात, की आपण stressला कसा सामना देणार. काही stresses हे चांगले असू शकतात तर काही वाईट. चांगले stress उत्तेजक असतात तर वाईट stress ने येतो थकवा आणि ग्लानी. एखाद्या स्ट्रेसफुल गोष्टीनंतर जवळजवळ तीन मिनिटात मेंदू ॲड्रेनॅलीनसारखं chemical शरीरामध्ये पोहोचवतो. त्यामुळे लगेच आपली विचारशक्ती वाढते, शारीरिक शक्ती द्विगुणित होते. आपली सगळी इंद्रिये जास्त efficiency ने काम करतात. या सर्व बदलामुळे आपण stressful प्रतिस्थितीचा सामना देऊ शकतो. पण हाच stress महिनोनमहिने किंवा वर्षोनुवर्षे चालू राहिला तर त्याचा रोगप्रतिकारक शक्तीवर (immune system) तेवढाच वाईट परिणाम होतो. जेव्हा मनुष्याला अनेक तणाव एकाच वेळी सहन करायला लागतात (घटस्फोट, बेरोजगारी, प्रिय व्यक्तीचा मृत्यू) त्यावेळी त्याचाही शरीरावर असाच परिणाम होतो. बऱ्याचदा, चांगल्या घटनासुद्धा stressful असू शकतात उदाहरणार्थ: साखरपुडा, लग्न, कामामध्ये बढती किंवा सेवानिवृत्ती!

तणावाला सांभाळणं म्हणजे वाघाला संभाळण्यासारखं आहे. आपण वाघावर नियंत्रण केले नाही तर तो आपल्यालाच खाऊन टाकेल. तणावाचं सुद्धा असंच असतं. त्याला नियंत्रित केलं नाही तर बऱ्याच वाईट गोष्टी होऊ शकतात. गेल्या कित्येक वर्षांच्या संशोधनामधून असं समजलंय, की अनियंत्रित तणावामुळे रक्तदाब (high blood pressure), मधुमेह (diabetes), लठ्ठपणा (obesity), stroke किंवा heart attack ची शक्यता फार वाढते. इतकंच काय पण stress मुळे कॅन्सरची chemotherapy सुद्धा तेवढी प्रभावी ठरत नाही. म्हणूनच meditation आणि stress- reduction हा कॅन्सरच्या उपकाराचा अविभाज्य भाग समाजाला जातो.

मागील दोन वर्षं आपण सर्वजण एक असामान्य प्रतिकूल परिस्थितीमधून जात आहोत. कोवीड विषाणूने आपल्या सर्वांच्या तोंडचं पाणी पळवलं आहे. आपल्याला पुष्कळ stress दिला आहे, आपण या तणावाच्या वाघाला नियंत्रित केलं नाही तर तो आपले लचके तोडणार हे नक्की. या stress ला काबूत ठेवण्यासाठी आपण बऱ्याच गोष्टी करू शकतो. आपल्या दैनंदिन जीवनामध्ये या गोष्टींना अंतर्भूत करणं हे थोडसं कठीण पडतं पहिल्या पहिल्यांदा, पण एकदा सवय झाली, की सर्व जमून जातं. तणाव कमी करण्यासाठी मी आता ज्या गोष्टींचा उल्लेख करणार आहे त्या सर्व गोष्टींशी आपण सर्वजण नक्कीच परिचित असणार पण म्हणतात ना, की सोनाराने कान टोचले तर थोडं कमी दुखतं! म्हणून उल्लेख करतो:

१ व्यायाम (Exercise): व्यायाम म्हटला की आपल्या डोळ्यासमोर उभ्या राहतात दंड, बैठका, मल्लखांब किंवा सूर्यनमस्कार अशा धमकावणाऱ्या images. खरं म्हणजे

याशिवायही आपण बऱ्याच गोष्टी करू शकतो ज्यांनी तेवढाच फायदा होईल जेव्हढा gym मध्ये जाऊन होतो. चारपांच मजले lift ने जाण्याच्या ऐवजी पायऱ्या चढून जाणे किंवा घराच्या घरी शतपदी केल्याने सुद्धा फायदा होऊ शकतो. व्यायामाचे बरेच फायदे असतात- व्यायामामुळे आपला मेंदू जास्त इन्डॉर्फिन बनवतात आणि त्यामुळे आपल्याला मन:शांती तर मिळतेच पण जास्त गुणवत्तेची झोप सुद्धा लागते.

२ आहार (Diet): जेव्हा आपण तणावाखाली असतो त्यावेळी आपल्याला junk food खाण्याची फार ओढ असते. चांगलं balanced diet ठेवणं फार महत्वाचं आहे अशावेळी. संतुलित आहाराने आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि रक्तदाब तसेच मधुमेहासारखे रोगही कमी होण्याची शक्यता वाढते. आहारामध्ये antioxidants असणे सुद्धा महत्वाचे आहे. अँटिऑक्सिडंट्स आपल्या पेशींचे रोगापासून संरक्षण करतात. द्राक्ष, ब्लूबेरी, रासबेरी या फळांमध्ये बरेच अँटिऑक्सिडंट्स असतात.

३ स्लीप हायजिन (Sleep Hygiene): पुरेशी झोप शरीराला फारच आवश्यक आहे. मानसिक तणावामुळे झोपेचं एकदम खोबरं होऊन जातं! निद्रानाशामुळे शारीरिक तसेच मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. आपली भूक मंदावते, लक्ष केंद्रित करण्याची (कॉन्सन्ट्रेशन) क्षमता कमी होते आणि अस्वस्थता सुद्धा वाढते. योग्य आणि पोषक आहार, प्राणायाम, योग आणि stress-free अवस्थेमध्ये चांगली झोप लागू शकते. चांगल्या निद्रास्वास्थ्यासाठी sleep hygiene पाळणे फार महत्वाचे आहे.

४ विश्रांती तंत्र (Realaxation technique): ध्यान (meditation), योगनिद्रा (guided meditation), खोल श्वास (deep breathing) घेणे किंवा बायोफीडबॅक (स्वायत्ततेने होणारे शरीरकार्य व्यवस्थित चालू असण्याविषयी व्यक्तीला दिलेला दृश्य अथवा श्राव्य पुरावा) या सगळ्याच्या वापरामुळे मानसिक तणाव खूप कमी होतो.

५ आपल्या मित्रमैत्रिणीशी संबंध वाढवा: व्हॉटस ऍप, झूम या सुविधांमुळे आता आपल्याला नातेवाईकांशी आणि मित्रमैत्रिणींशी संबंध वाढवणं फार सोपं झालं आहे. Healthy socialization मुळे मानसिक stress वाढण्याची शक्यता कमी होते.

६ सेवाभावी कार्य (charitable work): Cleveland Clinic मध्ये झालेल्या संशोधनांमध्ये हे सिद्ध झाले आहे, की स्वार्थरहित समाजकार्यामुळे (selfless socialwork) आपल्या मानसिक आणि शारीरिक परिस्थितीवर एकदम चांगला परिणाम होतो. अर्थात, आपण जेव्हा लोकांच्या दुःखाकडे लक्ष देतो तेव्हा आपल्या स्वतःच्या दुःखाचा stress सुद्धा कमी भासतो ते वेगळे.

७ नवे छंद शिका: मानसिक तणावावर एक सर्वोत्तम उपाय म्हणजे नवे छंद शिकणे- नवे वाद्य, चित्रकला, नृत्य किंवा तुमच्या कुटुंबीयांनी परवानगी दिली (!) तर गायलाही शिका. आता मीच बघा, जवळजवळ पन्नास वर्षांनी हा मराठीमध्ये लेख लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे. नवे छंद शिकल्याने मानसिक तणाव कमी होतोच शिवाय स्मृतिभ्रंश (dementia) होण्याची वेळ पुढे ढकलली जाते.

मानसशास्त्रामध्ये एक ब्रीदवाक्य आहे: आपलं परिस्थितीवर नेहमीच नियंत्रण असू शकेल असं नाही पण आपल्या परिस्थितीच्या प्रतिक्रियेवर आपलं नक्की नियंत्रण असू शकतं (We can't control the circumstances but we can certainly choose our response to it). या कॉरोनाने आपली परिस्थिती गंभीर केली असेल पण त्या परिस्थितीला आपली प्रतिक्रिया काय असणार आहे ते आपणच ठरवायचे ना? मग काय ठरलं?



डॉ. चंद्रगुप्त शशिशेखर वेदक
मानसोपचारतज्ज्ञ, शिकागो

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२१

||अध्यात्मपीठ, इतिहासमंच, साहित्यकट्टा||

सादर करीत आहे,

प्रवचन

विषय: 'दैनंदिन जीवन आणि भगवद्गीता'

प्रवचनकार: विद्यावाचस्पती गुरुदेव श्री. शंकर अभ्यंकर

दिनांक: मंगळवार, डिसेंबर २८, २०२१

वेळ: रात्री ७:३० - १०:०० (शिकागो स्थानिक वेळ)

आयोजक: अध्यात्मपीठ, इतिहासमंच, साहित्यकट्टा

प्रस्तुत कार्यक्रम महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या यूट्यूब चॅनलवरून थेट प्रक्षेपित केला जाणार आहे. खालील लिंकद्वारे कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा.

https://youtube.com/c/MaharashtraMandalChicago

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२२
॥ इतिहासमंच ॥
प्रस्तुत करत आहे

आधुनिक भारताचे शिल्पकार
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
व्याख्यान: श्री. श्रीधर दामले

आयोजन: चेतन रेगे, उल्का नगरकर, प्रसाद अथणीकर,
शलाका रेगे, अनुराधा केळकर, माधव गोगावले
वेळ: शुक्रवार, ७ जानेवारी २०२२
रात्रौ ८:०० ते ९:३० (शिकागो स्थानिक प्रमाणवेळ)

विचार एका रम्य सकाळी

रम्य सुगंधी सकाळी एका
उपवनात रमले होते
हसत्या फुलांत निरखित होते
किलबिलणारे घरटे
अन्

एक पिलूं चिऊचे इवले,
माऊने जखमी केले
ते दुखी स्वरे चिवचिवते
ने घरट्यामध्ये माते ॥

त्या इवल्या चोचीमध्यें
मी हळू घातले पाणि
कळवळून मीहि रडले
चीवचीवची गाऊन गाणि. ॥

गवताची गादी केली
पिंजरा नवा आणोनी
ते अजून रडतची होते
अपुले कोणि दिसेना म्हणोनी. ॥

ती सफल झालिना सेवा
ते पिलूं अनंती गेले
अन् दु:ख मुक्या प्राण्याचे
माझ्या ह्रदयी आले ?

मज स्वामिनीस जो प्रेमे
अपुली शिकार अर्पून जाई
तो बिडाल क्रुर शिकारी
कां काळ पिलासि होई ?



आहे जीव जिवांचे जीवन
प्रकृतिची असते शिकवण
निरागस माऊस माझ्या
काहीच नव्हती अनबन. ॥

हा खेळच परमेशाचा,
जो आहे अंतर्यामी
कोण त्यास पुसणारे
या मायेचा तो स्वामी. ॥

रेखा खंडेपारकर

Pocket Stars – My FLL Experience

Happy New Year and Happy Makar Sankrant to everyone! I am Prisha Athanikar and I am 9 years old. In this article, I am going to share my experiences and learnings in 2021-2022 FLL Competition. FLL stand for, First Lego League. FLL is all about performing to your highest capabilities and skills, competing with other participating teams and scoring points for your team. FLL is conducted every year at Regional, State, National and Global levels. There are judges who judge your work and give you scores and suggestions to excel to next level of the competition. I participated in the competition this year for the very first time, little nervous and more excited. Each year FLL organizers announce a new topic for the competition. This year's topic was "Cargo Connect". You know, in FLL, many things could be different for you and you want to have an experience doing it. Some of the interesting activities or tasks could be, building a robot and its attachments, programming the robot to complete missions and score points, even make new friends, and most of all, learn more about the world. I had enrolled in FLL to have an opportunity to do them all.

There were many teams who participated in this worldwide competition. Our team's name was POCKET STARS! In our team, we had 6 boys and 4 girls from 4th to 7th grades. My dad was Assistant Coach. For

the competition, we had to prepare for multiple presentations. There are the three main presentations we present in front of the judges, Project Work, Robot Design and Core Values (CV).

Let's dive into our Project Work. In Project Work, our team had to come up with a problem statement, that is aligned with the topic, "Cargo Connect" and solution to mitigate it. Cargo Connect is based on the supply chain management and transportation management of produce, goods, appliances, electronics, furniture, and many more. We started looking at supply chains, like fruits, electronics, automobiles and medicines. As we went on with different supply chains, we discovered cold chains, these supply chains are used for produce and medicines. After lot of research for our problem statement, we finally halted on "hot pockets". Hot pockets are areas of hot air that are surrounded by cold air which mostly occurs in the interior parts of a shipping/cargo container. See, we learned a new thing just now.

Now, we had our problem statement, but no solution yet. To figure that out, we split

up into sub-teams. My sub-team was tasked to figure out cost effectiveness of the proposed solution. This means to find out if it's affordable, doesn't cost too much money to manufacture, use and maintain. Finally, after tons of research, our proposed solution was to change the color of the shipping/cargo container, what a simple solution! Doesn't even cost millions of dollars just to repaint the container. Alongside of finding our solution, we again discovered something new, darker colors absorb more heat, causing more food spoilage, and lighter colors reflect most heat, helping the cold chain goods ripen and not get rotten.

Now, we had our problem statement and proposed solution statement. Next activities were to review them with experts and make an effort towards outreach. As for experts, we talked to Mr. Mitra and Mr. Singh, both work in supply chain management companies and know about some ideas we could use as our solution for the identified problem. For outreach, we reached out to different shipping companies and made a Facebook page for our team, called Pocket Stars, in which we posted a short video of an experiment. This experiment elaborated our solution and provided evidences of its usefulness. In the video, we had two mailboxes, one colored a regular color of a shipping container, Cherry Red, and other colored with one of our two proposed colors for the shipping containers, "Easter Lily". We had utilized smart thermometers and a thermal camera to prove that Easter Lily absorbs less heat and creates least to no hot pockets in the mailbox.

Second was the Core Values presentation. In core values, we, as a team, needed to showcase our teamwork, interpersonal respect, kindness, fun, inclusiveness, impact, innovative ideas, and more that we experienced during our FLL journey, in front of the judges. One of the unique core values is to say good luck to other competing teams for their performances in the competition.

Last but not the least, the Robot Design presentation. We built our EV3 robot, "Robot 360", we named it, and described its design, different attachments used to complete missions, programs, strategy matrix to complete maximum missions, very well to the judges. The parts of the robot, the design process, how we programmed it, and the

errors we have to fix in the robot these were major sections on our trifold.

So much information, where are we going to put it?! In our brains? No, we put it on the posters and trifolds with lots of drawings and details, for everyone and the judges to have a visual. We also prepared a skit to present our project work.

Before the competition, we practiced lots of table runs and improved our robot programs to complete maximum possible missions in stipulated 2.5 minutes and score more and more points.

Three months of preparation went very fast. We started in September and culmination was the day of the Regional level competition, December, 18th. Like all other teams, we had been given 30 minutes to present our three presentations to the judges. Judges really liked our skit. It was funny but informative. And as per judges, we had one of the best introductions to team in the skit. “Hello Judges, we are the Pocket Stars!!” And we jumped and turned our backs to the judges. Our team t-shirts had a Star on the back with our names on them. Fantastic idea, isn’t it?

During our table runs, we got really good scores. The award session was also awesome. Organizers appreciated and congratulated all the teams and their coaches. Few teams were recognized for their table run scores, few for their presentations and few teams, including us, advanced to the State Level competition. It’s on January 15th.

This was my first time in FLL competition. Now I will begin my next journey of representing my team at the IL State Level.

Wish me good luck!! Thank you.

Prisha Athanikar

The Sky and the Sea

Untouchable salty waves and ripples
echoing with every touch
The never-ending blue: a threshold for a
different world.
The tides push and pull under the moon's
perpetual clutch
A sweet breeze intertwines with my fingers
and my toes curl
Hues of gold floating in the wind, the small
grains under my feet
I am a small speck under the sky and next
to a wall of transparent beauty
The sun and the sea's unbroken skyline
meet.
Here I am, protected by Poseidon's trident,
held by its silent deity
Apollo's fiery creation slowly seeps under.
The two gods immersed in a treacherous
battle until the sea triumphs;
The sky erupts, suddenly ablaze with a
million colors,
The moon rises, the clouds illuminate with a
soft blush,
The sky is dampened,
I am at peace.

Archisha Pathak

Maharashtra Mandal Chicago (MMC) 2022

** Amhi Sare Gavayye (ASG) **

presents

First Karaoke Program of 2022

Theme - Patriotic Songs

Date – Saturday Jan 8th 2022

Time – 6PM to 8PM Central Time

Link: https://youtube.com/c/MaharashtraMandalChicago

Maharashtra Mandal Chicago 2022
Arogya Dham presents

Topic :Understanding Low back pain and 15 mins workout to improve core muscle strength

Session by - Dipti Govardhan

practicing Physical Therapist in the state of IL and WI

Date - Saturday, Jan 8th 2022
Time - 9:30-10:30 am

The zoom link will be given to MMC members.

Program will be available on MMC youtube channel lateron.

https://youtube.com/c/MaharashtraMandalChicago

शब्दकोडे

१		२		३	■	४		५		६
	■		■	७	८		■		■	
९				■		■	१०			
	■		■	११		१२	■		■	
१३	१४				■	१५			१६	
■		■	■	१७			■	■		■
१८		१९			■	२०		२१		२२
	■		■	२३	२४		■		■	
२५				■		■	२६			
	■		■	२७		२८	■		■	
२९					■	३०				

आडवे शब्द

१. सीतेला ह्या दिव्यातून जावे लागले
४. जी ए कुलकर्णी यांचा १९६२ मध्ये प्रथम प्रकाशित झालेला कथासंग्रह
७. चांदीचे
९. सभेचा अध्यक्ष
१०. थंडीचे किंवा उष्णतेचे मोजमाप
११. हवेत विहंग करणारी, ___ पाखरे
१३. शेंगातील हिरवे दाणे घालून केलेला भाताचा प्रकार
१५. पाताळात प्रवेश करण्याचे ठिकाण
१७. ___ चेहरा - डोळ्यातून अश्रू येत असताना
१८. मागच्या वेळी प्रथम आलेला
२०. शंकर, ज्याने लांब केस धारण केलेले आहेत असा
२३. ___ येईना म्हणे अंगण वाकडे
२५. छोटेसे, चिमुकले
२६. सर्वांनी एकत्रपणे करायचा व्यायाम
२७. ढळत असलेला, उदा. दिवस
२९. शरीरातील रक्त वाहून नेणारे तंतू
३०. बाहेरील बाजूला असलेले टणक आवरण, विशेषतः कीटकांमध्ये हे आढळते

उभे शब्द

१. शैक्षणिक पात्रता पूर्ण करण्यासाठी आखून दिलेला मार्ग
२. इतरांच्यासाठी केलेली कृती
३. मीठ
४. भले, चांगले
५. किती वाजता काय करायचे याचा आराखडा
६. पगारी नोकर
८. ___ म्हातारी - अतिशय वृद्ध
११. वरून खाली येताना, उदा. जिना, शिडी, वगैरे
१२. घड्याळात छोटा काटा तीनवर आणि मोठा काटा बारावर असताना..
१४. फेकीत, पाण्याच्या मोठ्या पिंपात..
१६. एक युग
१८. सुरेश भटांना दिलेली उपमा, विशिष्ट प्रकारच्या कविता लिहिणारा
१९. हवाई जहाजाच्या प्रवासाची सुविधा
२१. वाहता प्रवाह, अनेक भागांत क्रमशः चालू असलेली कथा (विशेषतः टी व्ही वर!)
२२. नीट सांगता न येण्यासारखे, ___ होते आहे मला..
२४. ___ (एकही) शब्द न बोलता
२७. सुनील गावस्करचे टोपण नाव
२८. मालकी

अभिजित रायरीकर

मित्र

मित्र असणं खरंच एवढं महत्त्वाचं असतं,
रक्ताच्या नात्यापेक्षा महत्त्वाचं?
भावंडांबरोबरही कदाचित
तेवढं जवळचं नातं होत नसतं.
मित्रांमध्ये सारखेपणही क्वचितच असतं
बहुतेक वेळा सर्वच बाबतीत वेगळेपण असतं
तरी असं काय असतं ज्यावर
हे नातं टिकून राहातं?
नात्यांमध्ये पण
वर -खाली कमी -जास्त
मान- अपमान असतं
फक्त मैत्रीमध्ये या सगळ्यांना स्थान नसतं.
घरी बोलताना देखील
अलिखित नियमांच बंधन असतं
मैत्रीमध्ये न कसले बंधन
हेच मुळी अंतर्भूत असतं.
जात-पात पैसा-अडका
याचं महत्त्व नसतं
मित्रत्व एका पातळीवर
एकसमान असतं.
एकमेकांचे विचार जुळणं
आवश्यक नसतं,
खरं तर बोलण्याचं पूर्ण स्वातंत्र्य
इथेच मिळतं.
मित्रांशिवाय हे
जीवनच अपूर्ण असतं
आणि म्हणूनच मित्र असणं
अत्यावश्यक असतं.
आयुष्य उल्हसित करती
मैत्र जणू अत्तराची कुपी
मैत्ररूपी आरसा
जपून ठेवावा ऊरी.

अश्विनी कुंटे

सप्टेंबर २०२१ ते मार्च २०२२ दिनदर्शिका

२०२२		दिनदर्शिका
१४ जानेवारी	पौष शु. १३	मकर संक्रांत
२६ जानेवारी	पौष कृ. ९	गणराज्य दिन
५ फेब्रुवारी	माघ शु. ५ (समाप्ति १६.१७)	वसंत पंचमी
७ फेब्रुवारी	माघ शु. सप्तमी (समाप्ति १८.४७)	रथसप्तमी, जागतिक सूर्यनमस्कार दिन
१९ फेब्रुवारी	माघ कृ. तृतीया	छ. शिवाजी महाराज जयंती (तारखेनुसार)
१७ मार्च	फाल्गुन शु. पौर्णिमा	हुताशनी पौर्णिमा (होळी)
१८ मार्च	फाल्गुन शु. प्रतिपदा	धूलिवंदन, करिदिन
२० मार्च	फाल्गुन कृ. तृतीया	छ. शिवाजी महाराज जयंती (तिथीनुसार)
२२ मार्च	फाल्गुन कृ. पंचमी	रंगपंचमी
१ एप्रिल	चैत्र शु. प्रतिपदा	चैत्र मासारंभ, शके १९४४, शुभकृत् संवत्सरारंभ, गुढीपाडवा

वरील दिनदर्शिका शिकागोच्या स्थानिक वेळेनुसार असल्याने काही सण भारतीय कालनिर्णयापेक्षा वेगळे आहेत ह्याची कृपया नोंद घ्यावी.

संदर्भ: कालनिर्णय, दाते पंचांग

वर्षा रा. विसाळ
ज्योतिष विशारद

कृष्ण आणि अर्जुन

कृष्णाने अर्जुनाला सांगितली गीता,
शिकविली त्याने ही न कंटाळता
हजारो वर्षे झाली, आपल्यातला अर्जुन शिकत नाही
आणि कृष्णही शिकवण्याचे सोडत नाही

साधे साधे प्रश्न पण काय करायचे कळत नाही
मोलाचा वेळ मात्र वाया जात राही.
हेवा वाटतो अर्जुनाचा कृष्ण त्याचा सखा
रणांगणी ऐनवेळी साथ दिली त्याला.

प्रश्न काय म्हणून विचारताय नक्की कोणता सांगू
बघा इथेही confusion हा सांगू की तो सांगू
आम्हा बायकांचा जन्मच असा
तळ्यात की मळ्यात कायम असते समस्या

लहानपणी मोठ्यांचे ऐकायचे कारण तेव्हा आम्हाला कळत नसते
मोठेपणी लहानांचे कारण नवीन पिढीशी जुळवून घ्यायचे असते
म्हणजे प्रत्येक वेळी मृदुंगासारख्या थपडा खाणे हेच हातात असते.
परिस्थितीला सामोरे जाणे हे एवढेच लक्ष्य दिसते.

Breakfast lunch and dinner चक्रात अडकलेल्या आम्ही
कितीही साग्रसंगीत केले तरी काहीतरी सतत असते कमी
शंभरपैकी शंभर मार्क कधीच मिळत नाहीत
आनंदाची परिसीमा कधीच गाठता येत नाही

द्रौपदीचा तो पाठीराखा, आमच्याही मदतीला येतो धावून
अनेक नाती, विविध नावे वेगवेगळे चेहरे घेऊन
सगेसोयरे, आप्तस्वकीय, मित्रमैत्रिणी असे किती तरी
इवल्याशा या आमच्या जगात आनंद देतात क्षणोक्षणी.

नि:शंक मनाने लढला अर्जुन माळ घातली यशाने
तोच धडा गिरवित आम्ही चालत राहतो नेटाने
कृष्णाच्या सोबतीची खात्री कायम आहे
पुढे जात राहणे एवढेच काम आहे.

सुचेता भालेराव

आयसिंग ऑन द केक

कालच बर्फवृष्टी झाली. खरं तर याआधी बर्फ पडून गेला पण तासा दोन तासात गायब! जोपर्यंत एखादा पांढराशुभ्र गालिचा अंथरावा असा एकसंध शुभ्र थर दृष्टीला पडत नाही तोपर्यंत काही त्या हिवाळ्यातील पहिला बर्फ झाला असं म्हणता येणारच नाही!

असा सर्वदूर जिथे नजर जाईल तिथे निसर्गाचा भाग झालेला बर्फ मी अमेरिकेत येण्याआधी अनुभवला नव्हता. नाही म्हणायला कॉलेजच्या सहलीसोबत सिमल्याला बर्फ पाहिल्याचं आठवतं पण ते सौंदर्य विलक्षणच!! सभोवताली हिमाच्छादित पर्वत रांगा, चहुबाजूला जिथे नजर जाईल तिथे धवल रंगाचीच विविध छटा! पर्वतांवर जणू पायऱ्या असाव्यात तशी वेगवेगळ्या टप्प्यांवर बांधलेली घरं, त्यांच्या उतरत्या छपरांवर साचलेला बर्फ! जिथे जिथे नजर पाहोचेल तिथे दूरपर्यंत दिसणारे कुठलेसे हिमशिखर. फूट दीड फूट सर्वदूर साचलेला बर्फ. समुद्रसपाटीपासून उंचावर असल्याने जड झालेला श्वास, आणि जणू स्वर्गातून पुष्पवर्षाव व्हावा तसा अलगद होणारा हिमवर्षाव! या अनुभवाची जातकुळी फारच निराळी. हे निसर्गसौंदर्य तुम्हाला रोजच्या आयुष्यातून उचलून एका वेगळ्याच पातळीवर नेऊन ठेवतं. हा हिमवर्षाव अलौकिक प्रकारात जमा व्हावा असा! खरं तर या हिमवर्षावाचं सौन्दर्य इतकं विलक्षण वाटलं होतं त्यावेळी, की कालिदासाने कुमारसंभव या महाकाव्यात एका सुभाषितात, हिमाला हिमालयात आढळणारा दोष का म्हटलं हेच कोड वाटलं होतं.

अनंत रत्न प्रभवस्य यस्य हिमं न सौभाग्य विलोपिजातं।
एकोहि दोषोगुणसन्निपाते निमज्जतिन्दु किरणेष्विवंकः॥

वेगवेगळी अनेक रत्नं असलेल्या या हिमालयाचे सौंदर्य फक्त बर्फामुळे नाहीसे होत नाही. जसे सुंदर किरणांनी वेढले असल्यामुळे चंद्रावरचे डाग दिसूनही येत नाहीत तसं अनेक गुणांच्या सान्निध्यात एखादा दोष जाणवतही नाही.

खरं तर हिम हेच हिमालयाचं सौन्दर्य नाही का? कालिदासासारख्या सौन्दर्यासक्त प्रतिभावान कवीला असं कसं वाटलं असेल याचं मला तेव्हा फार आश्चर्य वाटलं होतं. इतके हिवाळे इथे अमेरिकेत काढल्यावर या त्याच्या मताचं मला आश्चर्य वाटत नाही आता. महाकवी असला तरी काय झालं? त्याला सुद्धा त्याच्या कुटीसमोरचा बर्फ सतत साफ करायचा कंटाळा येणारच ना?

मराठीत 'Ice' या शब्दाला सुद्धा बर्फ म्हणतात आणि snow ला सुद्धा बर्फच! त्यामुळे त्या त्या वाक्याच्या संदर्भात Ice किंवा snow असा त्याचा अर्थ लावून घ्यावा लागतो. मी माझ्या आयुष्यातली पहिली दोन सव्वा दोन दशकं भारतात राहिले आहे. त्यामुळे बर्फ हा शब्द ऐकला, की लगेच डोळ्यासमोर उभा राहतो तो सरबतांमध्ये टाकलेला बर्फाचा खडा किंवा गाड्यावर टाकलेल्या बर्फाच्या लादीला तासून खरवडून, रंगबीरंगी साखरेचे सिरप टाकून केलेला बर्फाचा गोळा. तो आईची नजर चुकवून विकत घेण्यात आणि मैत्रिणींबरोबर गप्पा आणि मिटक्या मारत फस्त करण्यात मजा येत असे. त्यामुळे बर्फ या शब्दाचा संदर्भ माझ्यालेखी नकळतपणे रसनेशी जोडला गेला आहे. केकवरच्या मलाईच्या सजावटीला 'icing' म्हंटलं जातं. 'Light dusting' हलक्याशा हिमवर्षावाला देखील म्हटलं जातं आणि केक किंवा इतर गोड पदार्थांवर हलक्या हाताने भुरभुरवलेल्या पिठीसाखरेच्या थराला सुद्धा. त्यामुळे बर्फाचा आणि जिव्हेचा, गोडव्याचा संबंध अजूनच दृढ झाल्यासारखं वाटतं.

बर्फ पडला असं ऐकलं, की डोळ्यासमोर निसर्गाचं चित्र उभं राहण्याऐवजी मोठी बर्फाची लादी खाली पडून फुटली आहे असंच चित्र मन खट्याळपणे नजरेसमोर उभं करतं. आणि हिमवृष्टी झाली असं म्हणावं तर उगाच उत्तुंग हिमालय डोळ्यासमोर येतो. मग बाहेरच्या दृश्यांनी

भ्रमनिरास होण्याची भीती. त्यामुळे snow झाला असंच म्हणायचं मी ठरवलं आहे. थोडं धेडगुजरी वाटलं तरीही.

आपल्या मनाचीही एक गमतीदार सवय असते नाही? एखादा शब्द आठवला, की त्या शब्दाशी निगडीत कितीतरी आठवणी ते आपल्या दृष्टीसमोर आणून ठेवतं. आणि आपणही क्षणात त्या आठवणींची कालयात्रा करून येतो. स्नो हा शब्द मी पहिल्यांदा ऐकला तो एका वेगळ्याच संदर्भात. एकदा लहानपणी आजोळी गेले असता एक सुंदर पांढऱ्याशुभ्र डबीकडे माझं लक्ष गेलं. त्या छोट्याशा डबीवर सोनेरी अक्षरात काहीतरी लिहिलं होतं आणि सुंदर सोनेरी फुलांची नक्षी त्यावर होती. त्या फुलांना स्नोफ्लेक्स म्हणतात हे तेव्हा मला ठाऊक नव्हतं. कुतूहलाने ती डबी उघडून पहाते तो काय, सुंदर सुगंध असलेलं पांढरंशुभ्र लोण्यासारखं काहीतरी त्यात होतं. पुढे हे स्नो प्रकरण कालबाह्य झालं आणि त्याजागी कोल्ड क्रीम आलं. पण स्नो या शब्दाशी ती डबी आणि तो सुवास कायमचा जोडला गेला हे खरं.

तर पहिला स्नो झाला काल. प्रचंड थंडी, वारा आणि काळवंडलेलं ढगाळ वातावरण होतं तेव्हा. पण आज सकाळी उठून बघते तो सगळीकडे बर्फाचा दोन इंच थर साचला होता. आकाश स्वच्छ आणि लखलखीत ऊन! खाचखळगे, दगडमाती, हिरवळ, रस्ते यांचं नामोनिशाण मिटवून अंथरलेला एकसंध शुभ्र थर! वर आकाशाची निरभ्र निळाई आणि खाली निष्कलंक शुभ्रधवल झिलई! वातावरणात खरोखरच पवित्रता जाणवत होती. कुठे हा शुभ्र थर उन्हाचा सोनेरी वर्ख लेवून तळपत होता तर कुठे सावलीत जडावाचे हिरे लावलेल्या रेशमी वस्त्रासारखा पहुडला होता. अशा या स्नोचे सौन्दर्य मला भुरळ घालते. आणि मग खिडक्यांचे पडदे, ब्लाइंड्स पूर्णपणे उघडून मी या सुंदर दृश्याला माझ्या घरात आणते.

या पहिल्या स्नोचं कोण कौतुक होते. अंगावर पोशाखाचे थर, कानटोपी, बूट, हातमोजे आणि अवजड कोट असा जामानिमा उत्साहाने चढवला जातो. कुरकुरीत कोऱ्या बर्फावर बुटांचे ठसे उमटवत आजूबाजूच्या परिसराचे निरीक्षण करत फेरफटका मारला जातो. लहान मुलं स्नो एन्जल करत बर्फात लोळून घेतात. आणि बऱ्याच घरांच्या अंगणात snowman किंवा snowwoman आकार घेऊ लागतात. काही वर्षांपूर्वी माझ्या मैत्रिणीने स्नो शिवलिंग तयार केलं होतं. आणि माझ्या बहिणीने स्नो गणपती. अनेक नवखे शिल्पकार एवढा मोठा मटेरिअल्सचा साठा फुकट उपलब्ध झाल्याच्या उत्साहात अनेक शिल्प आणि ऍबस्ट्रॅक्ट शिल्पं तयार करून हाताची कला आजमावतात. माझ्या काही धाडसी मैत्रिणी टोबोगन राइड्स आणि स्कीईंग पण करून आल्या आहेत. मी मात्र माझ्या क्षमतेची किंवा अक्षमतेची म्हणूया, पूर्ण जाणीव असल्यामुळे काही अशा फंदात पडत नाही. स्नोच्या निमित्ताने हॉट चॉकोलेट, केक किंवा कुकीज अशा हिवाळ्याला साजेशा पाककृती आवर्जून केल्या जातात. या पहिल्या स्नोचा जितका आनंद घेता येईल तितका मी घेते. अगदी उत्साहाने ड्राइव्ह वे सुद्धा साफ करते. खोऱ्याने पैसे काढले नाही तरी बर्फ मात्र नक्की काढते.

मग काही दिवसांनी हळूहळू हा स्नो तुकड्या तुकड्यांनी वितळतो आणि जणू आतापर्यंत लपलेल्या पण रया गेलेल्या हिरवळीला, खाचखळग्यांना हळू हळू उघडे पाडतो. ते बघणं मात्र नकोसं होतं. आतापर्यंतचं सौन्दर्य वरवरचं होतं याची जाणीव होते. पुन्हा एकदा स्नो होतो. पुन्हा सगळे सोपस्कार तसेच साजरे होतात पण का कोण जाणे प्रत्येक वेळी त्यातला उत्साह कणभर कमीच होत जातो. मग हळू हळू गोठणबिंदूखालच्या तापमानाचा जाच वाटायला लागतो, लवकर होणाऱ्या सूर्यास्ताचा कंटाळा येतो. जेव्हा दिवसचे दिवस सूर्य दिसत नाही अशा ग्रे वातावरणाचा उबग येतो. आणि या सुंदर स्नोचे कौतुक वाटेनासे होते. इथे मात्र मी मनोमन कालिदासाचे म्हणणे मान्य करते.

मी जितकी वर्षे भारतात काढली आहेत जवळजवळ तितकीच वर्षे इथे पण. आता बोटांवर मोजण्याइतकी वर्षे पार पडली, की मी अमेरिकेत जास्त

दिवस राहिले आहे असं म्हणू शकेन. गेली कित्येक वर्षे स्नो, कडक हिवाळा, गोठणबिंदू खाली जाणारे तापमान हे सलग माझ्या अनुभवविश्वाचा भाग झाले आहेत. असं असूनही ही दृश्यं अजूनही नवखी किंवा परकी का वाटतात? याउलट कितीही वर्षांच्या खंडानंतर भारतात गेलं तरी तिथली झाडं, उन्ह, पक्षी, गर्दी हे ओळखीचं आणि आपलंच वाटत राहतं. मग मध्ये कितीही वर्ष गेलेली असेना का.

हे असं कसं होत असेल नाही? लहानपणी जे प्रसंग, आवाज, गाणी, दृश्यं, सुवास आपल्या कोऱ्या मनःपटलावर सतत अविरतपणे उमटत राहतात, तेच सर्व अनुभव आपल्या धाटणीचा, घडणीचा एक अविभाज्य भाग होऊन जातात. बालपणी पंचेंद्रियांनी गोळा केलेल्या अनुभवांच्या उभ्या आडव्या धाग्यातून मनाचं वस्त्र विणलं जात असेल का? मग अशा या मनाच्या वस्त्राची वीण पक्की झाली, की मग नवीन कितीही अनुभव घ्या ते वस्त्रावर वरून केलेल्या रंगोटीसारखे थोडे उपरेच राहत असावेत का?

जर मी गेली बरेच वर्ष सलगपणे या snow landscape चा अनुभव घेते आहे. तर अजूनही आंब्याचं झाड, कोकिळेचा आवाज, श्रावणातला पाऊस, लतादीदींचा आवाज हे अगदी आपलं कसं वाटतं? त्याच्या तुलनेत स्नो, मॅग्नोलियाचा बहर, मेपलची झाडं, वीपिन्ग विलोची पाण्यात डोकावणारी दृश्यं, रेड कार्डिनल पक्षी, मॅलार्ड बदकं हे सगळे अनुभव ओळखीचे होतात पण जिवाभावाचे का नाही वाटत? वसंतात अंगभर कळ्यांनी बहरून येणारी झाडं, फॉलमध्ये होणारा रंगोत्सव या सगळ्याचा आनंद मी मनापासून घेते. तरीही हे आपला भाग नाहीत याची जाणीव का राहत असावी? याचं मला फार कुतूहल आहे. हे जे सुंदर अनुभवविश्व मला स्वतःचा भाग आहे असं वाटत नाही तेच सुंदर अनुभवविश्व पुढच्या पिढीला मात्र अगदी आपलं आणि त्यांच्या मनाचा,अस्तित्वाचा अविभाज्य भाग वाटणार आहे. आणि त्यांना मग भारतातल्या उन्हाचं, वनराईचं, रस्त्यावर भटकणाऱ्या गायींचं कुतूहल जरी वाटलं तरी परकेपण जाणवत राहणार.

आणि म्हणूनच दरवर्षी येणाऱ्या या पहिल्या स्नोकडे मी खरोखर अप्रूपाने आणि नवलाईने पहाते. बर्फाचा पोत न्याहाळते, लखलखत्या उन्हात चमचमणारी त्याची खडी निरखते. आणि हलके हलके हवेत गिरक्या घेत अवतरणाऱ्या स्नोफ्लेकला हळुवारपणे चेहऱ्यावर झेलून घेते. आणि त्याबरोबर हेही जाणून असते, की पंधरवड्यातच मी याला कंटाळणार आणि ऋतुराज वसंताची चातकासारखी वाट पाहणार. मग पुन्हा नव्याने निष्पर्ण झालेल्या झाडांवर धुमारे फुटताना पाहण्याची, इवल्या इवल्या कळ्यांनी संपूर्ण झाड लागडलेलं पाहून हरखून जाण्याची ओढ लागणार.

वसंत 'चेरी ऑन टॉप' आहे असं म्हणत राहणार. आणि असं जरी असलं तरी स्नो आणि हिवाळा म्हणजे सुद्धा 'आयसिंग ऑन द केक' आहे याची जाणीव ठेवणार.

श्रद्धा भट

दही

आयुष्य असावे दह्यासारखे
रोज नव्याने भांड्यात लावायचे
सकाळी त्याचे काय करावे
प्रत्येकाने ते आपापले ठरवायचे

कोरे दही अगदी 'सेट' दिसते
म्हणून का ते तसेच ठेवायचे?
तसेच राहिले तर आंबट होते
म्हणून ते वेळीच वापरायचे!

कधी कोशिंबिर, तर कधी दहीवडे
आयुष्यात असेच प्रयोग करायचे
कधी गोड, कधी खारट लस्सीचे
अनुभव प्रत्येकालाच रोज यायचे!

मात्र रोज आयुष्याच्या भांड्यातले
थोडे दही बाजूला काढून ठेवायचे
झोपण्यापूर्वी दुसऱ्या दिवसासाठी
नवीन दह्याचे विरजण लावायचे!

रोज लावलेल्या आयुष्याचे दही
सकाळी सेट न झाल्यास काय करायचे?
न लाजता 'विरजणाची' मदत मागून
पुन्हा नव्याने कामाला लागायचे!

अभिजीत रायरीकर

ASKM
ESTATE SOLUTIONS
You Ask, We Do The Task!
Worried about buying or selling properties?
kw INFINITY
KELLERWILLIAMS.
ASK YOUR REALTY PARTNER
Experienced in dealing in out of State properties
HURRY, BOOK AN APPOINTMENT!
YOU ASK, WE DO THE TASK!
If you have any questions related to property,
ASK SANJAY
SANJAY MARATHE
Real Estate Broker
(630) 915-2970 (Cell #) (630) 778-5800 (Office)
608 S Washington St #100, Naperville, IL 60540
www.askmrealty.com sanjaym@kw.com
Search for homes from cell phone
TEXT: KWS8KPH TO: 87778

Archana Paranjape
real estate broker
630.854.9137
arch@atproperties.com
@properties
Stop looking, start finding®
Your Neighbor
Your Realtor
If you have any real estate buying, selling or rental needs in the Chicagoland and surrounding suburban area, then feel free to contact me!
I will be more that happy to help you find your perfect home!
Archana Paranjape
Cell: (630) 854 9137
Email: arch@atproperties.com

नामदेव मल्हारजी म्हात्रे

आपल्या लाईफमधल्या घटना आणि त्यात भेटणारी माणसं जर आपल्याला निवडता आली असती तर अॅट-लीस्ट मला तरी बोर झालं असतं. निसर्गानं असं काही आर्किटेक्चर बनवलंय, की जे कोणी आपल्याला भेटतं, त्याचं काही-ना-काही कारण नक्की असतं. म्हणजे लगेच प्रत्येक नात्यात 'आपलं काही काम निघतंय का!', हे शोधायला सुरू करा असं मी मुळीच म्हणणार नाही. लोकं भेटत जातात, नाती बनत जातात. इट्स यू, हू हॅज टू डिसाईड अॅन्ड जस्ट मेनटेन दोज रिलेशन्स. माझ्या आयुष्यात इतरांसारखेच बरेच लोक आले, पण काही लोकं च्यूविंग-गम केसांना चिकटावं तसं चिकटतात.

मला पहिली कंपनी ही कॅम्पसमध्येच मिळाली. आई-वडिलांच्या आशीर्वादाने आणि आई भवानीच्या कृपेनेच उच्च शिक्षण पूर्ण झालं, कारण त्यासाठी कष्ट केल्याचं मला तरी काही आठवत नाहीये. मग आला 'इंडक्शन प्रोग्रॅम'. ज्यांना हे काय असतं ते माहीत नसेल तर सांगतो. 'इंडक्शन प्रोग्रॅम' म्हणजे फ्रेशर लोकांना कम्पनीमध्ये हळुवारपणे सामावून घेण्याचं तंत्र, म्हणजे ते बावरून जाऊ नयेत, आणि कंपनी बद्दल 'आहाहा... काय कंपनी आहे आपली! काय पोरी आहेत इथल्या!' असाच गोड गैरसमज निर्माण करण्याची आयडिया. तर असाच 'इंडक्शन प्रोग्रॅम' माझ्या पहिल्या कंपनीने शिमल्याला ठेवला होता, ते देखील संपूर्ण एक महिना. एकूण ३५० भारतीय पोरं-पोरींना इथे एकत्र आणलं होतं. एका कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये आमची राहायची सोय केली होती. जॉयनिंग फॉर्म भरून घेणं चाललेलं. माझ्यासोबत अजून सात जणं आमच्या कॉलेजचे इथे सिलेक्ट झाले होते. मी नाव लिहिणार तोच अचानक माझ्या फॉर्म, पॅन्ट आणि उजव्या खांद्यावर काळ्या शाईचे ठिपके प्रकट झाले.

"तुझ्या ***, कोण केलं रे हे!" असं बोंबलतंच मी उठलो. मागे पाहिलं तर काही पोरी फॉर्म्स भरत होत्या आणि त्यांच्याकडे तर बॉलपेनं होती. त्यात एक-दोन दिसायला लईच भारी होत्या त्यामुळे मी पुढची शिवी आवरली. पण मुख्य गुन्हेगार पसार झालेला.

"कंपनीच्या पहिल्याच दिवशी काळी शाई अंगावर म्हणजे चांगलं लक्षण नाही सम्या!" असलं अपशकुनी बोलणं फक्त धर्मेशच करू शकतो. हा माणूस कधीही बघावं, तर दुसऱ्याच्या फाटलेल्या पॅन्टकडेच बोट दाखवताना सापडलाय मला. एक नंबरची सॅडिस्ट असतात काही माणसं यार. मला सवय झालीये म्हणून मी दुर्लक्ष केलं, पण त्या गडबडीत तो माणूस सापडलाच नाही. तणतणतच मी दुसरा फॉर्म घेतला आणि भरायला बसलो. अर्धाच भरून झाला होता आणि,

"म्हात्रे नामदेव मल्हारजी... आईचा घो! च्यायला चुकून राहिलं ना नाम्या, काय करायला!" असं स्वत:शीच शेजारी कोणीतरी ओरडलं.

इतक्या मोठ्या कंपनीत आल्यावर सुद्धा कोणाचं चालतंय हे थोबाड, हे बघायला जवळपास सगळेच वळाले. बाकीचे जे नाही वळाले ते अमराठी होते ते ओळखलं. लाईट पिंक टीशर्ट, फॉर्मल काळी पॅन्ट, काळा रंग, आणि हातात काळं शाईपेन घेऊन हा माणूस फॉर्म भरताना मला दिसला. च्या मारी, सापडला की राव! ते पेन बघून मी ठरवलेलं, की ह्याला नंतर हटकायचं. पण त्यानेच माझ्याकडे पाहिलं आणि थोडा स्माईल दिला. मग फॉर्म घेऊन माझ्याजवळ येऊन बसला.

"इज धिस टू? माय सरन्येम इज म्हात्रे" माझ्यासमोर त्याने फॉर्म धरलेला.

मी पूर्ण ब्लॅंक झालो, "म्हणजे काय!" असं मी थोडं इरिटेट होऊन आणि चेष्टेच्या सुरातच बोललो.
मराठी सापडलेला पाहून तो थोडा निवांत झाला, "अरे, म्हनजे इथे सरनेमची जागा नाही ना, म्हनून विचारलं मी."

"अरे लास्ट नेम आहे की."

डोळे मोठे करून, मी अत्यंत हुशारीचं काहीतरी बोललो आहे असा त्याचा चेहेरा झाला एकदम, "आयला लाश्ट नेम इज ईक्वल टू सरनेम, हे मला ठाऊक नव्हतं ल्येका!"

'ह्या असल्या आयटमला इतक्या मोठ्या कंपनीत सिलेक्ट तरी कसं केलं!' हे आम्ही नंतर बराच वेळ एक ईगोइस्टिक डिस्कशन केलं. आम्ही बाकी राज्यातल्या पोरींबरोबर इंट्रोड्यूस होत असताना माझं लक्ष नाम्याकडे गेलं. एका झाडाखाली त्याच्या आई, वहिनी, किंवा बहिणीनं दुधाच्या पिशवीत बांधून दिलेलं थालीपीठ खात बसलेला तो.

हॉस्टेलच्या रूमचा नंबर समजला आणि मी रूममध्ये गेलो, तर समोर बेडवर ओळखीचा लाईट पिंक टीशर्ट दिसला. "शिट!" येवढाच आवाज तोंडातून आला. एक अख्खा महिना नाम्याबरोबर! नो वेज डूड! कुणालाही समजायच्या आत मी रूम पटकन बदलून घेतली आणि म्हात्रे एकटाच त्या रूममध्ये राहू लागला. फक्त पंधरा दिवस झालेले जेव्हा आम्ही शिमल्यात धिंगाणा घालत होतो आणि मला अचानक नाम्या सूटकेस घेऊन रिक्षात बसताना दिसला. मी विचारलं तर थोडा थांबला, काहीतरी विचार केला, एक सुस्कारा टाकला आणि म्हणाला, "बाप मेला मित्रा, परत चाललो." इतकंच बोलला आणि शेकहॅन्ड करून गेला. पूर्ण पंधरा दिवसात कोणाशीच मैत्री न करता नाम्या वेन्ट अवे.

आज त्या सगळ्याला पाच वर्ष उलटून गेली. तो इंडक्श्न प्रोग्रॅम आता फेसबुक किंवा पिकासामध्ये अधून मधून दिसून येतो. आपण किती बालिश होतो आणि आपल्यात किती मोठा फरक पडलाय हे देखील लगेच समजतं. म्हणजे दिसण्यात बरं का, बालिशपणाबद्दल नो कमेन्ट्स! Maturity of thoughts is never dependent on years of work experience. आपण किती मॅच्युअर आहोत हे सिच्युवेशन दाखवते, व्हेयर पीपल हार्डली पास दॅट टेस्ट. असो!

पण आजपेक्षा थोडं मागे जातो. अंदाजे तीन वर्षापूर्वी एके दिवशी अचानक, माझ्या जुन्या कंपनीत डेटाबेसवाल्या मुलाने पेपर टाकले. पेपर टाकले म्हणजे लगेच पहाटे सायकलीवर, गारठ्याचं, पावसा-पाण्याचं तो घरोघरी पेपर टाकत सुटला असं नाही. आमच्या इंडस्ट्रीत 'पेपर टाकणे' हे 'रिझाईन करणे' ला समानार्थी असतं. तर आमच्या डेटाबेसवाल्या पोराने रिझाईन केलं. प्रोजेक्ट ऐन रंगात असताना, त्याच भांडण आमच्या पी.एम. बरोबर झालं आणि त्याने आपला रंग दाखवला. मग काय, नवीन माणूस शोधणं आलं की! तोंडावर लग्न आहे आणि घरात अर्धी रूम रंगवून झाल्यावर अचानक रंगाऱ्याचं त्याच्या कंत्राटदारासोबत भांडण झालं, आणि तो तणतणंत निघून गेला तर भिंत कशी दिसेल, तसा आमचा प्रोजेक्ट दिसू लागला. एखाद्या आठवड्यानंतर नवा माणूस येणार असं कळालं. "खूप कडक इंटरव्ह्यू घेतलाय मी असं आमचा एक सिनियर मला म्हणाला. ह्याचा स्वत:चा इंटरव्ह्यू कोणी घेतला हे आधी आम्हाला शोधायचं होतं. अरे, डिझाईनिंग जो माणूस फक्त पेन्टब्रशमध्येच करू शकतो; ज्याच्या ई-मेलपुढे स्पेल-चेकने सुद्धा हात टेकले आहेत आणि जो दिवसभर फेसबुकचा उपयोग मॅट्रिमोनी साईट सारखा करत बसलेला असतो, असा माणूस होता हा. त्याची चॉईस आहे म्हटल्यावर आम्हीच पेपर टाकायचा विचार करत होतो. काही दिवसांनी आला तो माणूस समोर. आम्ही पहिल्यांदाच भेटत होतो. मी माझं नाव सांगितलं आणि तो चार-चौघात एकदम म्हणाला

"आय नो यू बरं का! वी ह्याव म्येट बिफोर समीर" अस्सल गावरान मराठमोळ्या इंग्लिशमध्ये त्याने ओपनिंग स्टेटमेन्ट केलं. साक्षात नाम्या माझ्यासमोर उभा आहे हे बघून मला धक्काच बसला.

"आय ॲम सॉरी आय डिडन्ट रेकगनाईज यू ॲट फर्स्ट!" एक नजर पी.एम. वर ठेवून मी आवाजात जरा सॉफिस्टिकेशन आणून म्हणालो.

"त्यात काये येवढं, यार! अरे ल्येका, दोन्हीपैकी काहीच दांडगं नाही ना आपल्यात; ना माझी पर्सन्यालिटी,

ना आपली ओळख. कशाला टेन्शन घेतो!" आणि मग त्याचे काळसर ओठ, थोडेसे पिवळे दात-कम-अवलीपणा दाखवत हसले. हे स्टेटमेन्ट मारल्याबरोबर सगळेच भेदरलेल्या नजरेनी आमच्या सिनियरकडे बघू लागले; ज्याने ह्याला सिलेक्ट केलं होतं. पी.एम. ने रुमाल काढला आणि बहुतेक त्याचं अप्रेजल चुलीत गेल्याचं त्याला एखादं छोटंसं स्वप्न देखील पडलं. त्याने घाम टिपला आणि मलाच "प्लीज, टेक केयर" असं म्हणून निघून गेला. म्हणजे केयर नक्की कोणाची घ्यायची होती; नाम्याची, प्रोजेक्टची, का स्वत: माझी. अहो टीम-लीड म्हटल्यावर मॅनेजर काय अवाजवी एक्सपेक्टेशन ठेवतील सांगता येत नाही!

आठवडा उलटून गेलेला आणि नामदेव म्हात्रे नुसताच डेटाबेस न्याहाळत बसलाय हे दिसू लागलं. काम पुढे सरकेचना. बरं एखादी तरी ईमेल यावी त्याच्याकडून, तर ते सुद्धा नाही. सगळी टीम "काही खरं नाही! काही खरं नाही!" हेच बोलताना दिसत होती. मग एके दिवशी मला आणि नाम्याला पी.एम. कडून एक ईमेल आली. नाम्याच्या प्रोग्रेसवर डाऊट येऊ लागलेला म्हणून एक टीम मीटिंग बोलावली. खात्री होती आम्हाला, की नाम्याला लवकरच लाथ बसणारे. मीटिंग-रूम गच्च भरलेली, पण सगळे शांत. मग नाम्याकडे बघून पी.एम. ने विचारलं, "प्लीज टेल द स्टेटस नामदेव. दहा दिवस झाले आता."

आणि मग मल्हारजींचे सूपुत्र बोलले, "आय डोन्ट थिंक वी कॅन प्रोसीड लाईक दिस! पार लावून ठेवलीये डेटाबेसची!" आवंढा गिळताना सुद्धा इतका त्रास होऊ शकतो हे मला त्या दिवशी समजलं. आमचा पी.एम. आधीच गोरापान. त्याच्या कानाच्या लाल रंगावरून त्याच्या अंगाच्या टेम्प्रेचरचा अंदाज आला. "अरे, पण मग तू हे आधी का नाही बोललास!" पी.एम. भडकला होता, "तुला म्हणून तर रिक्रूट केलेलं, सो दॅट यू विल टेक केयर. दहा दिवस झाले नामदेव, आणि आज मी मीटिंग बोलवल्यावर तू हे सांगतोस, की प्रोजेक्ट असा प्रोसीड होऊ शकत नाही म्हणून. आय ॲम गोइंग टू गो क्रेजी नाव!" सगळी रूम शांत आणि स्तब्ध. सगळेच जणं जमिनीकडे बघून, एक-मेकांना आणि खास करून पी.एम. च्या नजरेला टाळत होतो, आणि तेवढ्यात नाम्या बोलला, "मी प्रोजेक्टबद्दल काहीच बोललो नाहीये अजून. मी म्हणालो, आय डोन्ट थिन्क वी कॅन प्रोसीड लाईक दिस. म्हणजे आय ह्याव अनादर सोल्यूशन. डोन्ट वरी!" आणि वर त्या शांततेत तो जोरात हसला. पी.एम. ने हताश स्टाईलमध्ये डोकं हालवलं आणि तो काहीच न बोलता बाहेर निघून गेला. स्वत: शांत न राहाता, टीमला सुद्धा पॅनिक कसं करायचं हे आम्ही त्याच्याकडूनच शिकलो. रूममधून बाहेर आलो आणि सरळ खाली टपरीवर चहा प्यायला एकटाच गेलो. अर्धा कटिंग चहा हातात घेऊन मी जमिनीकडे नजर खिळवून बसलेलो. अप्रेजल बोंबललंय हे क्लियर दिसत होतं.

"टेन्शन घेऊ नकोस मित्रा, आपण करू सगळं नीट." एका हातात सिग्रेट आणि दुसऱ्या हातात मशीनची कॉफी घेऊन नाम्या शेजारी आला होता.

पुढचे पंधरा दिवस आणि रात्र कसे गेले समजलंच नाही. काम दनादन सुरू झालं आणि हाईट म्हणजे द प्रोजेक्ट वेन्ट परफेक्ट. क्लायंटची कौतुकास्पद मेलसुद्धा आली आणि वर त्याच्याकडून नवा प्रोजेक्टसुद्धा आला. पी.एम. ने झकास पार्टी वगैरे दिली. नाम्या एकदम हिरो झाला. आम्ही सगळ्या पोरांनी त्या रात्री कुलाब्याला एका बार मध्ये नुस्ता दंगा केला. तिथून रात्री दीडला, बॅन्ड-स्टॅन्डला बाईक्सवर गेलो. नाम्या आणि मी नुसते हसत सुटलेलो. नाम्या पिऊन आणि मी न पीताच नशेत होतो. यशाचा नशा!

मध्यरात्री वाशीच्या रूमवर परत आलो आणि मी नाम्याला विचारलं, "गड्या तू पहिले दहा दिवस काहीच कसं नाही बोललास. तुझा प्लॅन जर तू पी.एम. ला सांगितला असतास तर शिव्या नसत्या बसल्या."

"शेत पेरन्याआधी जमिनीचा अंदाज तर घ्यावाच, पन त्या अदूगर नको असलेलं गवत उपटनं आनि जमीन

साफ करनं जास्त गरजेचंय. मी आधीच्या त्या डेटबेसवाल्याची घान, आधीचे तीन दिवस पाहिली, आनि मग सात दिवस साफ केली. यू शुड फश्ट श्टेयर याट द शी, बिफोर शेलिंग इन वाईल्ड वॉटर्स! म्हन्जी, वादळात नाव सोडन्याअदुगर समिंद्राकडं एकदा बघनं फार गरजेचं असतंय गड्या!"

मी डोळे मोठे करून त्याच्याकडे पहातच राहिलो.

"काय झालं असं पहायला?" नाम्यानं विचारलं.

"मी फार मोठी गोष्ट शिकलो नाम्या आज."

"काय? माझं समिंद्राचं वाक्य ना? हा, मला पन त्ये लईच पटल्येलं. फार भारी आहे त्ये वाक्य." नाम्या भुवया उंचावून मला सांगत होता.

"ते नाही रे. कुणाच्या चेहऱ्यावर कधी जायचं नाही हे शिकलो!" माझा चेहेरा ॲज यूज्वल मिश्किल होत चाललेला मलाच जाणवत होता.

नाम्या हसत हसतच म्हणाला, "आयला राव सम्या, म्हन्जी मी चेहऱ्यावरून खुळा वाटलो होय र तुला. तुम्ही पुनेकर कधी काय बोलाल सांगता येत नाही!"

दोघांनाही झोप येत नव्हती आणि दुसऱ्या दिवशी सुट्टी होती. रात्रीचे तीन वाजलेले. आम्ही सी.डी. लावली आणि 'कॅच मी इफ यू कॅन' पहात बसलो. सगळा सिनेमा मला सीन-बाय-सीन त्याला समजावून सांगावा लागलेला. दोन-अडीच महिने उलटून गेलेले आणि सम्या-नाम्या ही जोडी पूर्ण कंपनीत फेमस झालेली. कुठेही जा, आम्ही एकत्र. काही दिवसांनी माझ्या रूममेटला ऑन-साईट मिळालं आणि तो अमेरिकेला गेला. नाम्या माझ्यासोबत लगेचंच शिफ्ट झाला. वी बिकेम बेस्ट फ्रेन्ड्स! त्याच्या सोबत कधीच काही टेन्शन नाही झालं. ना पैशाची घासा-घीस, ना सतत हिशोबाची कटकट. आठवड्यातून त्याची एकदा दारू आणि थियेटरमध्ये आमचा एक पिक्चर. "पुनेकर असून बऱ्यापैकी पैसा खर्च करतोस ल्येका तू. एखाददिवशी तुमच्या महापौराला कळलं तर हाकलेल तुला शहराबाहेर. इट डजन्ट सूट यूवर पुनेकर पर्सन्यालिटी!" ही असली वाक्यं हा मला नेहमी ऐकवायचा. स्वत: बुलडाना जिल्ह्यातल्या एका छोट्याशा गावातला आहे हा.

मार्च ते मे, हे अप्रेझलचे महिने. जास्तीत जास्त पगारवाढीपेक्षा, कंपनीला आणि मॅनेजमेन्टला जास्तीत जास्त शिव्या घालण्याचे हे महिने. अप्रेझल इंटरव्यूसाठी नाम्याला बोलावणं आलं. इंटरव्यूला आमचे पी.एम., डेटाबेसचे पी.एम. आणि प्रोजेक्ट-लीड असे बसलेले. ह्या इंटरव्यूच्या मार्कांना रेटिंग असं म्हणतात. नाम्याचे मार्क ऊर्फ रेटिंग आलं. अगदी बेस्ट मार्क्स आणि पगारवाढ घेऊन साहेब प्रमोट झाले. हे काही केल्या आमच्या प्रोजेक्ट लीडला पटत नव्हतं.

मी नाम्याला विचारलं, "काय रे, आपला प्रोजेक्ट लीड तुझ्यावर सतत खेकसत का असतो? तू नक्कीच अप्रेझलमध्ये तोंड फाडलं दिसतंय."

नाम्याने चहाचा घोट घेतला आणि म्हणाला, "अबे ते च*** का नाही भडकनार! त्याचा अप्रेझल डेटा पाहिलाय मी. हातावर तम्बाखू ठेवलीये कंपनीनं त्याच्या, आणि तोंडाला चुना फासलाय पी.एम. नं. माझं अप्रेझल पाहून जळतंय तिच्यायला!"

"पण नक्की झालं काय इंटरव्यूमध्ये?"

"अबे, मला आधी ह्यानं कमी मार्क दिले बरं का. मी विचारलं, कामुन? तर म्हनला कमुनिकेशन स्किल्स खूप वीक आहेत तुझ्या..."

नाम्याच्या इंटरव्यूचा किस्सा म्हटल्यावर दंगा असणार, मी चहाचा लास्ट घोट गटकला आणि पुढे ऐकू लागलो.

"... तर मी म्हनालो, दोन मिनिट दे, मी माझ्या सगळ्या ईमेल प्रिन्ट मारतो. जश्ट टेल मी व्हेर माय ग्रामर इज रॉन्ग. जश्ट टेल मी व्हेर द क्लायंट डिड नॉट अंडरश्ट्यान्ड माय ल्यान्गवेज..."

सिगरेटचा कश मारत नाम्या कंटीन्यूड, "... तर ते लीड मला म्हनलं, ते सगळं ठीक आहे पन तुझी वर्बल, म्हन्जी बोली भाषा, इम्प्रूव होनं गरजेचं आहे. मी म्हनालो, ते शक्य नाही. शेतातल्या मातीचा वास तर मार्केटच्या

भाजीला सुद्धा येतो, तर माझ्या भाषेला का नसंल! दॅट इज हू आय याम! ॲन्ड इफ यू फील द्याट इज द प्रॉब्लेम देन द्याट इज यूवर प्रॉब्लेम, नॉट माईन. कमुनिकेशन इज अबाऊट पुटिंग फॉरवर्ड द मेसेज. त्यो मेसेज जर समजला, तर तू पन जिकला अन मी पन. झाली की ल्येका तुमच्याच म्यानेजमेन्टची 'विन-विन' सिचुवेशन. म्हनून चिडलंय त्ये, कारन माझं कमुनिकेशन साहेबाला पटलं, ह्या ह*** ला नाय ना! कॉनफिडन्स आणि ट्यालेन्ट महत्त्वाचं, काय! ॲन्ड प्लस आय ॲम ट्राईंग टू इम्प्रूव."

हे चालू असतानाच मी हसून हसून वेडा होत होतो. थिस मॅन इज सो सिम्पल येट सो इफेक्टिव ॲन्ड डायनॅमिक! काय लागतं अजून काम करायला! ॲन्ड येस, ही वॉज इनडीड इम्प्रूविंग.

नाम्याबद्दल अजून सांगण्यासारखे खूप किस्से आहेत यार, पण जरा निवांत बोलूया.

अनेक महिने उलटत गेले. कधी नाम्या आणि मी एकाच प्रोजेक्टमध्ये असायचो, तर कधी क्लायंटच वेगळे. नाम्याला त्या कंपनीत येऊन, एक-सव्वा वर्ष झालेलं तसं, आणि एका सकाळी नाम्या आणि मी कॅन्टीनमध्ये गेलो. तिथे कंपनीतली एक अप्रतिम मुलगी मला भेटली आणि आम्ही थोडा वेळ बोलत उभे राहिलो. थोड्या वेळाने ती निघून गेली आणि ब्रेकफास्ट करून आम्ही परत आलो. उरलेला पूर्ण दिवस नाम्या एकदम शांत. लंचच्या वेळी सुद्धा काहीच बोलला नाही. मला वाटलं, तब्येत बरी नसेल म्हणून मी एकदोनदा विचारलं देखील. रात्री जेवणाच्या मेसवर ताट समोर येईसपर्यंत तोंड एकदम बंद त्याचं. मी पहिलाच घास घेतला आणि नाम्या तेव्हा अचानक बोलला, "सम्या, येकतरी पोरगी पाहिजे मला"

मला ठसकाच लागला एकदम,

"ह्ये घ्ये, पानी पी" पाण्याचा ग्लास मला भरून देत म्हात्रे बोलले, "भ*** ठसका तर असा लागलाय जसं काय मी वाईट वंगाळ बोलून राहिलो. अबे पोरगी पाहिजे म्हनजे गर्लफ्रेन्ड म्हनून राहिलो ना बे! तुझं डोकं कसं चाललं असेल ते ठाऊके मला."

मी ठसक्यातून सावरत म्हणालो "अबे ह***, तू एक तर अख्खा दिवस थोबाड बंद ठेवलंयस, आणि जेव्हा उघडलं तर डायरेक्ट हे स्टेटमेन्ट. काय, झालंय काय तुला?"

"तुला ना, मित्राचं दु:ख दिसेना झालंय. नाही, बरोबरे! स्वत:चं पोट गच्च भरल्यालं असंल, तर दुसऱ्याच्या बरगड्या कामुन बघनार तुम्ही!" नाम्याच्या चेहऱ्यावर फ्रस्ट्रेशन साफ दिसत होतं, पण मला आणि आमच्या इतर मित्रांना हसू आवरेना.

"हसू नकोस आनि येकतरी मैत्रीन मिळवून दे यार सम्या! तुला सांगतो सच्या, ह्या सम्याला नेहमी पाहातो मी. एक पोरगी नसेल कंपनीत जिच्याशी ह्याची ओळख नाही. अन येकाच घरात राहून आम्हाला बघा. आमचा नंबर एका जरी पोरीच्या फोनमध्ये दिसला तरी तिच्याशी लग्न करीन मी, ती कशी का असेना मग! आयला माझ्या शेजारी बसनाऱ्या त्या माधवी शक्सेनाला मी 'चहाला येती का?' असं विचारलं तर मला 'नाही नको, मी चहा घेत नाही', असं हिंदीत म्हनली. आनि पंधरा मिनिटानंतर ह्या सम्यासोबत कॉफी ढोसताना तिला मी पाहिलं. आता तूच सांग, का नाही जलनार माझी! हसनं बंद कर आधी आनि मदत कर यार सम्या."

मी ताकाचा घोट घेतला आणि हसू आवरून त्याला म्हणालो, "अरे नाम्या, त्या नुसत्या फ्रेन्ड्स आहेत माझ्या."

"ते काही नको सांगू, फक्त पोरगी पटवून दे. लग्न कराचंय बे, आता बास झालं!" अगदी केविलवाणा चेहेरा झालेला रे त्याचा!

मग मी किराणा मालाची यादी सांगावी तशी कंपनीतल्या मुलींची नावं घेऊ लागलो. ह्यातून नाम्याचा चॉईस काय आहे ते पहायचं होतं मला.

"काजल खन्ना.."

"अबे, तिच्या नावातच बॉलीवुडचा वास येऊन राहिलाय. तिला म्हातारपनी जरी मी प्रपोज क्येलं, तरी कवळी बाहेर काढून, चावा घेऊन हाकलून लावेल मला."

"प्रियांका कुलकर्णी..."

"वा वा! काय पन नाव घेतायत साहेब बघा! अबे ती अशी पोरगी हाये, जिन्हं फ्येसबुकमध्ये परवा नुस्तं ब्रॅकेट आनि ठिपके असं काढलं..."

नाम्याने समोर ताटाच्या खरकट्यावर :(हे चिन्ह काढून दाखवलं, "... तर नुस्तं ब्रॅकेट आनि दोन ठिपके असं काढलं तर तिला तीस कमेन्ट आल्या पोरांच्या. काही जनं तर बहुदा विचारपूस करायला तिच्या डेस्कवर पन गेले असतील ल्येकाचे. आनि आम्ही फ्येसबुक मधे त्येच केलं बरं का; शेम-टू-शेम त्येच केलं; तर आम्हाला कमेन्ट तर नाहीच नाही, वर चार 'लाईक' आले त्या मेसेजला. आता मला रडू येऊन राहिलं, श्याड फील होऊन राहिलं, ह्यात लाईक करन्यासारखं काये मित्रा!" आम्ही डोळ्यातून पाणी येईसतोवर हसत होतो. नाम्या म्हणजे पेटला होता, ऐकायलाच तयार नाही! पोरगी पटवणं जर इतकं सोपं असतं तर मी स्वत: आई-बापाला कशाला अरेंज्ड-मॅरेजचा त्रास दिला असता!

"त्ये काही नाही, दिवाळीवरून आलो परत आपन सगळे, की सम्या तू मदत करनारेस माझी सोईरीक जुळवायला. नैवेद्यापुरतं अफेर झालं की लग्नच करायचंय डायरेक्ट मला." अशी त्याची बडबड ऐकत आम्ही टेबलावरून उठलो. नाम्यासाठी मुलगी पटवायला जायचं, म्हणजे स्वत:च्या मैत्रिणी घालवून बसायची भीती होती मला. नाही, नाम्यात काहीच कमी नव्हतं ओ, पण जे होतं ते जरा जास्तच होतं. पण तरी मी ॲटलीस्ट एक सिम्पल मैत्रीण त्याला मिळवून द्यायला ट्राय करायचं ठरवलं. काही दिवसांनी आम्ही सगळेच दिवळीच्या सुट्टीसाठी आपापल्या गावी गेलो; मी पुण्याला, कोणी इंदौरला, कोणी दिल्ली तर कोणी चेन्नईला रवाना झाले. नाम्यासुद्धा त्याच्या गावी गेला; बुलडाणा जिल्ह्यातलं त्याचं कायगोली हे छोटसं गाव. नाम्याच्या भाषेत 'प्रत्येकाला प्रत्येकाच्या चपलीचा साईज सुद्धा पाठ असंल', इतकं छोटं गाव.

दिवाळीतच आईने मला एक गठ्ठा हातात दिला; ॲटलिस्ट डझनभर मुली माझ्या लग्नासाठी शॉर्टलिस्ट केल्या होत्या. "अगं आई, पण इतकी काय घाई!" असा वैताग मी काढला तर माझी आई म्हणाली, "अरे राजा, वय होत आलं आता आमचं. सगळं वेळेत झालेलं बरं असतं." हे इमोशनल वाक्य माझी आई माझ्या वयाच्या दुसऱ्या वर्षापासून मारत आलीये. ऐकून घेत आलोय, काय करता!

स्वत: आईच हातात फोटो देतीये म्हटल्यावर मी निर्लज्ज होऊन फोटोतल्या पोरी नीट न्याहाळू लागलो. त्यात एक तर इतकी भारी होती यार, काय सांगू! पण तिची डेट ऑफ बर्थ मी इयत्ता पाचवीत असतानाची होती. म्हणजे माझं लग्न उतारवयात झालं असं नाही बरं का, तर तिच्या बापाला घाई झालेली तिच्या लग्नाची. आईला बाबांना सुद्धा ते मान्य नव्हतं, कारण तब्बल आठ-नऊ वर्षांचं अंतर होतं आमच्यात. पण ह्या आई नामक जिवाला लग्नाची इतकी घाई असते, की मी मुकाट्याने फोटो पाहिले, नकार दिला, एक वाद घातला, आणि मुंबईला परत आलो. असे अनेक आठवडे चालत आलेला हा सीन. त्या प्रकाराचे तर इतके आयटम किस्से आहेत, सो त्यासाठी एकदा वेगळं बसू आपण.

वाशीला परत आलो आणि कळालं नाम्याला अजून एक-दोन दिवस उशीर होणार आहे यायला. 'सगळं ठीक आहे ना?' हे विचारायला मी त्याला कॉलपण केला. फोनवरसुद्धा मोघम उत्तरं दिली त्याने. तीन दिवस लीव्ह एक्सटेन्ड करून तो परत आला. एरवी गावी गेला की खायला हमखास काही ना काही घेऊन येणार. पण ह्या वेळेस आला तो मोकळ्या हातांनी आणि त्याहून अस्वस्थ करणाऱ्या त्याच्या शांततेसोबत. इतकं शांत मी त्याला कधीच पाहिलं नव्हतं. "अरे नाम्या काय झालं गावाकडे, काहीतरी सांग?" असं मी सतत विचारत होतो, पण तो काहीच बोलेना. दहा एक दिवस उलटून गेले पण तरी काहीच बदल नव्हता. मेसवर सुद्धा आला तर यायचा जेवायला, नाहीतर एकटाच टी.व्ही. चे चॅनल बदलत घरात पडून रहायचा. एके दिवशी माझी नजर सहज त्याच्या व्हिस्कीच्या बाटलीकडे गेली, तर थोडं विचित्रच वाटलं. ती बाटली अर्ध्याहून अधिक भरलेली होती. नाम्या

बेवडा नव्हता, पण एक दिवसाआड, किंव्हा मूडप्रमाणे, एक पेग तरी नक्की मारणार. मग मात्र माझी काळजी एकदम वाढली, आणि म्हणून त्याला चीयर करायला मी घरातच एक पार्टी ठेवली. वीकएन्डला ग्रूपमधली दहा-बारा पोरं आली, बीयर आणि कोक आणलं, राजीबनी मस्त चिकन बनवलं, आणि ॲज यूज्वल झकास मैफिल जमली. हे सगळं हरवलेल्या नाम्याला परत आमच्या जगात आणायला केलेलं होतं, हे त्याला सोडून सगळ्यांना माहीत होतं. नाम्यासुद्धा जरा मूडमध्ये येऊ लागला. सो द प्लॅन सीम्ड टू बी वर्कींग. तेवढ्यात नाम्याचा मोबाईल वाजला. कायगोलीवरतून फोन होता हे लक्षात आलं, कारण नाम्या पुन्हा सीरीयस झाला आणि फोनवर बोलायला आतल्या रूममध्ये गेला. पाच एक मिनिटात बाहेर आला तो डोळे लाल आणि पाणावलेले घेऊन. बाकी कोणाचं लक्ष नाही गेलं त्याच्याकडे, आणि सगळ्यांची नजर चुकवून तो बाहेर निघून गेला. तो टेरेसवर गेलाय हे मला माहीत होतं, म्हणून मी भयनाक टेन्शनमध्येच त्याच्यामागे पळालो. बाकी मित्रांना कशाचा अंदाज लागला नव्हता, सो दे कंटीन्यूड द पार्टी.

टेरेसवर गेलो आणि नेहमीच्याच ठिकाणी, म्हणजे बिल्डिंगच्या टाकीवर नाम्या बसला होता. मी वरती त्याच्याजवळ गेलो. नाम्या रंगाने ठिक्कर काळा होता, पण चंद्रप्रकाशात त्याच्या गालांवरचा ओलसरपणा लपला नाही.

“नाम्या, भ***, आत्ताच्या आत्ता खरं काय झालंय ते बोलणार आहेस तू! डूड, आय कान्ट टेक थिस एनीमोर. प्लीज बोल यार. प्लीज काहीतरी...”

“बाप मेला माझा आत्ताच सम्या” माझं वाक्य आणि मन अर्ध कापून काढलं त्याच्या वाक्याने. त्याच्या डोळ्यातून पाणी वहात होतं, पण तो ढसाढसा रडत नव्हता.

तेवढ्यात मला काहीतरी आठवलं. “बाप मेला मित्रा, परत चाललो” हे तो मला इंडक्शन प्रोग्रॅममध्ये बोलला होता. मी थोडा अजूनच गार पडलेलो. “अरे पण तू तर म्हणालेलास...”

“मला माहितीये तू काय विचार करून राहिलायस”, नाम्याला सुद्धा ते वाक्य आठवत होतं. मी त्याच्या शेजारी बसलो आणि खांद्यावर हात ठेवला. आय सिरीयसली डिडन्ट नो हाऊ टू रीयॅक्ट! एक मोठा सुसकारा टाकत आणि गाल पुसत नाम्या बोलला,

“सम्या, मला बाप खरं तर कधी नव्हताच. फक्त आईच्या कपाळावर, आनि हळदी-कुकवाच्या कार्यक्रमात तिच्या ओटीत त्याचा प्रेझेन्स, बस्स! त्या दोघांचं लग्न झालं अन त्याची नोकरी गेली. मग काय; दोन एकर शेती, जी आमचे आबा सांभाळत होते, तीच तो नांगरू लागला. पन पाऊस कुठंय रे विदर्भात! त्याच वर्षी पूर्न शेत विकायची वेळ आली. बसा तिचायला बोम्बलंत! मग माझा जन्म झाला...” नाम्या एकुलता एक मुलगा आहे हे मला ठाऊक होतं.

“माझा जन्म झाला आनि मग तो एकदम बदलत गेला. पोटाच्या खड्ड्याचं फ्रस्ट्रेशन त्यानं दारूनं भरून काढलं. आमच्या इथे पान्याची टंचाई असंल पन म*** दारू कधीच संपनार नाही. बाटली आली आनि मग पाठोपाठ बाईपन आली बापाकडे. पन ती आई नसून आमच्या गावातली येक क्यारेक्टरलेस बाई होती. आईला, मला आनि आबाला सोडून तो तिच्याकडे चालला ग्येला. मग काय, वाताहत टू बी कंटीन्यूड की रे सम्या! काही दिवसांनी त्या दोघांनी गावच सोडला. तेव्हापासून मल्हारजी इज प्रेजेन्ट ओनली इन माय मिडल नेम.”

बीयरचा एक घोट घेत त्याने पुन्हा डोळे पुसले. माझा श्वास सुद्धा कापत होता हे जाणवू लागलेलं मला. इतकी डिस्टर्बिंग लाईफ हिस्टरी माझ्या सोबत रोज रहात होती हे कधी समजूनच येऊन नाही दिलेलं ह्या हलकटानं. नेहमी हसत हसवत रहाणार.

“आपल्या पहिल्या भेटीत मी जेव्हा म्हणालो, की माझा बाप मेला, तेव्हा त्यानं एका तिसऱ्याच बाईशी लग्न

क्येलाचा मला फोन आलेला सम्या. आईला सांभाळायला परत जावं लागलं. बापाचा सपोर्ट काय असतो सम्या हे तुमच्यासारख्या मित्रांच्याच घरात पाहतो मी; बरं वाटतं! दिवाळीत कळालं, की त्याला आजार झालाय कोनतातरी. मी विचारायला सुद्धा नाही गेलो. कशाला जाऊ! अरे माझा चेहेरा सुद्धा लक्षात नसेल त्याच्या. आता सुद्धा जाईन ते आईखातर, अन आबाचा आग्रह म्हनून त्याला आग द्यायला. नाहीतर, नॉट याट ऑल नीडेड!"

त्यानं बीयर संपवली आणि पुढचा अर्धा तास आम्ही बसून राहिलो तिथेच. मध्ये मी मेसेज पाठवला खाली 'शट द पार्टी, नाम्याज फादर एक्सपायर्ड!' रात्री त्याला झोप येईना म्हणून बाईक्सवर एका लॉन्ग ड्राईव्हला सगळेच गेलो. सकाळी त्याला गाडीत बसवून दिलं आणि मग पुढचे पंधरा दिवस तो गावाकडेच होता.

दोन आठवडे होऊन गेलेले. सकाळी सहा वाजता मी बेड मध्ये गाढ झोपलो होतो. अत्यंत भयानक स्वप्न पडत होतं आणि अचानक माझ्या अंगातला टी-शर्ट कोणीतरी फाडतंय असं मला जाणवलं आणि दचकून जाग आली. नाम्यानी माझ्या अंगातल्या टी-शर्टला फाडून त्याचं जॅकेट केलं होतं, "अबे येडा झालास का नाम्या!" मी ओरडतच उठलो.

"अबे भ*** तुम्ही पुनेकर कशात पैशे वाचवाल समजून नाही राहिलं मला. कितीन्दा सांगून राहिलो मी हा शर्ट नको घालूस म्हनून. फाटके कपडे घालनं दलिंदराचं लक्षन असतंय. आनि ऊठ लवकर तुझ्यासाठी न्यूज आहे माझ्याकडे. लग्न ठरलं ल्येका."

चिंध्या झालेला टीशर्ट फेकत मी ओरडलो, "अबे, काय सांगतोस! कोण, कुठली, कसं काय, काय करते?"

"अबे, मला पन थोडं विचित्रंच वाटून राहिलंय सगळं, पन आईनं आधीच पाहून ठेवलेली म्हने. यंगेजमेन्ट आहे दोन महिन्यंनी. गावतलीच आहे, वर्गात होती माझ्या, साळेत असतानी. आयला तेव्हाच पटवली असती तर लऊ-म्यारेज झालं असतं ना गड्या! म्हनलं तुझ्या भरवश्यावर रहान्यात काहीच पॉईन्ट नाही. आमच्या विदर्भातली पानी टंचाई संपेल पन पोरगी पटायची नाही."

'नामदेव मल्हारजी म्हात्रे' वॉज बॅक!

बायोडेटावरती एक्स्पीरीयन्स ३.६ दिसू लागलेला. हे अनुभवाचं वय सांगायची गंमत अशी की आज-काल माझ्या मुलाचं वय सुद्धा मी १.३ सांगतो. नॉन-आयटी वाल्या लोकांना गंमत वाटते ऐकताना. तर मूळ मुद्दा असा की ३.६ वर्ष झालेली आणि मी मुंबई सोडून पुण्याला आलो. काही दिवसांनी नाम्याने कंपनीच सोडली आणि पुण्याला शिफ्ट झाला. दोघांचीही लग्नं ठरलेली. माझी होणारी बायको विदर्भातली आहे ह्या एकाच पॉइन्टवरती तो माझा मेव्हणा झाला.

"आयला सम्या, लग्नानंतर तुझ्या घरी जेवनाची जुगलबंदी चालनार बघ. वहिनी तिखट, आनि तू गोड. फार गोड खाता राव तुम्ही पुनेकर. चिकन, मटनमध्ये साखर टाकता येत नाही म्हनून खोबरं टाकून त्ये पन गोड. आरारारा! आनि आमचा विदर्भी ठसका बघ आता. झनझनीत!" माझ्या सुदैवानं तसं काही नाही झालं. बायको अगदी सुगरण मिळाली, नाहीतर पाईल्सची स्वप्नं पडू लागलेली मला ह्या ह*** नाम्यामुळे.

काही महिने उलटले आणि आमची लग्नं सुद्धा पार पडली. संसार सुरू झालेले आणि मग करियरमधला फोकस वाढू लागला. नाम्याशी कॉन्टॅक्ट संपले नाहीत, पण दुर्मीळ झाले. महिन्यातून एखादा फोन किंवा मेल, तर कधी चॅट. नाम्याने पुण्याच्या मध्यभागी, अगदी पेठेत एक जागा भाड्याने घेतली. कोणी विचारलं, की "नाम्या कुठे रहातोस?" तर अवलीपणा दाखवत "डाऊनटाऊन पुने" असा टिळक रोडवरचा त्याचा पत्ता सांगायचा.

सगळं तसं नॉर्मल चाललं होतं पण एक मोठी उडी हवी होती. एखादा सैनिक बॉर्डरवर लढण्याचं जसं स्वप्न पहातो, तसाच प्रत्येक सॉफ्टवेयर इंजिनीयर ऑन-साईटचं स्वप्नं पहातो. ह्याचंच ध्येय उराशी बाळगून करियरची सुरुवात होते. एका रविवारी संध्याकाळी मी

आणि नाम्या 'एस.पी. कॉलेज' समोर भेटलो आणि हाच विषय निघाला.

"च्यामारी सम्या हद्द झाली राव" असं म्हणत नामदेवने कटिंग चहाचा घोट घेतला. टिळक रोडवरच्याच एका अमृततुल्यामध्ये आम्ही बसलेलो. (नॉन-पुणेकर लोकांसाठी; अमृततुल्य इज-ईक्वल-टू चहाचं हॉटेल किंवा टपरी).

"काय झालं रे?" मी विचारलं.

नाम्याने अजून एक चहा मागवला आणि म्हणाला, "अबे परवा माझा पासपोर्ट एक्सपायर झाला. आयला राव कोनताही ऐरागैरा जाऊन राहिला ना राव ऑन-साईट, अन आपन बसलोय इथंच. नेपाळचा का होईना, पन एकतरी वीजा पासपोर्टला चिकटू देत यार."

"खरंय यार नाम्या. पण नशिबात असेल तर मिळेल रे. आणि तसंही तुझं ऑनसाईट झालंय की रे!" मी खवचटपणाने म्हणालो.

"हा बरोबरे! करा चेष्टा आमची. आयला माझं ऑन-साईट म्हनजे दोन महिने कोल्हापूर आनि सहा महिने इचलकरंजी. आनि हो; मध्ये तीन महिने उरूळीकांचन. तेच आमचं यू.के. म्हनायचं झालं."

नाम्या आधी साताऱ्याला एका छोट्या कंपनीत होता. मालक आणि तो, असे दोनच प्रोग्रॅमर त्या कंपनीत. पतपेढ्या, सहकारी बँका, छोट्या दुकानांची, कारखान्यांची बिलिंग सिस्टिम असे प्रोजेक्ट असायचे तिथे. म्हणून हीच शहरं हे त्याचं ऑन-साईट. आणि खरं सांगायचं तर, नॉन-आयटीवाल्यांसाठी ऑन-साईट म्हणजे परदेश, असं ईक्वेशन झालं असलं तरी ते चुकीचं आहे. ऑन-साईट म्हणजे थेट क्लायंट किंवा कस्टमरच्या ऑफिसमध्ये बसून करण्याचं काम; भले मग शहर किंवा देश कोणताही असो. मला सुद्धा एका परदेश यात्रेची अत्यंत ओढ लागलेली, ॲन्ड फायनली वन डे माय प्रेयर वॉज ॲन्सर्ड; साऊथ आफ्रिका! ज्या दिवशी हे तिकीट आलं, त्या दिवशी नाम्या माझ्यापेक्षा जास्त खुश होता. मी आणि माझ्या बायकोसोबत ते कपल शॉपिंगला सुद्धा आलं.

जवळपास दोन महिने झालेले मला जोहॅनेसबर्गमध्ये येऊन, आणि कंपनीत डेटाबेसच्या माणसाची रिक्वायरमेन्ट आली. वेळ न दवडता नाम्याचा रेज्यूमे मी पुढे सरकवला. टॅलेन्ट आहे त्याच्यात, तो सिलेक्टसुद्धा झाला. मग काय यार! नाम्या महिन्याभरात साऊथ आफ्रिकेत माझ्या सोबत. एका घरात नाही रहात, पण एकाच बिल्डिंगमध्ये आहोत. म्हणालो ना, काही माणसं च्यूविंग-गम केसांना चिकटावं तशी चिकटतात!

परदेश म्हटलं, की नवीन कल्चर, नवं शहर, नवी माणसं आणि नवे कोरे किस्से. तसं तर इथे बरंच काही घडत असतं, पण काही ठरावीक किस्से सांगतो.

जोहॅनेसबर्ग हे अत्यंत सुंदर महानगर आहे, पण त्याचं अजून एक मोठं कारण म्हणजे इथल्या पोरी यार! काय सांगू राव! कोणाचे डोळे छान, कोणाचे केस, कोणाचं स्माईल, तर कोणाची स्टाईल; हे असं आपण नेहमी ऐकत असतो. इथे म्हणजे रस्त्यावर ब्यूटी कॉम्पिटीशन सुरू असते. नाम्या म्हणजे पहिल्या आठवड्यात सैरावैरा धावत सुटलेला. आपलं लग्न झालंय हे विसरून, टक लावून उभा असायचा. मात्र फालतूपणा आम्ही कधीच केला नाही. भारताची सीमा एकदा का ओलांडली, की काही लोकं चारित्र्याची सीमा ओलांडायचा वीजा मिळालाय, असा समज करून घेतात. मी, नाम्या आणि आमच्या आजूबाजूच्या अनेक मित्रांनी मात्र हा बॅलेन्स कधीच ढळू दिला नाही. मजा करा, दंगा करा, अरे मी तर म्हणतो व्यसन नाही लागत तितकी दारू सुद्धा प्या. आमचा नाम्या आठवड्यातून एक-दोन पेग मारतोच की. पण नको त्या गल्लीत आपली उपस्थिती दाखवणं; कधीच नाही. असो! प्रत्येकाला अक्कल नावाचा अवयव नाही देता येत देवाला, पण तो प्रकार अस्तित्वात असतो. म्हणून ते मी इथे पाजळत नाही. लोकांना तोंड काळं करायचंय, त्यांनी जरूर करावं. पण माझ्याकडे "चल की एकदा, काय होतंय!" असं म्हणत आलात पुन्हा, तर त्या

रंगात निळा रंग मिसळायला मी मागेपुढे पहात नसतो; आणि माझ्यापेक्षा नाम्या!

नाम्याचा अजून एक हिट किस्सा इथल्या एका सलूनमध्ये घडला. जोहॅनेसबर्गमध्ये फोर्ड्सबर्ग नावाचा एक एरीया आहे. भारतीय, पाकीस्तानी, बांगलादेशी आणि आफ्रीकी लोक इथे अत्यंत शांतपणे आपापला धंदा करत असतात. इथल्या एका हेयर-कटिंग सलूनमध्ये आमची महिन्यातून एकदा तरी चक्कर असते; चाऊ-थाई मेन्स पार्लर. आता पाकिस्तानी माणसानी चायनीज नाव का द्यावं त्याच्या दुकानाला हे एक कोडंच आहे. असो! तर आम्ही एका रविवारी इथे आमची डोकी दाखवायला गेलो. परदेश म्हटलं, की नाम्या इंग्लिशमध्येच सुरू होतो एकदम. ते ठीक होतं, पण पाकिस्तान्यानं हिंदी सुरु केलं, तेव्हा नाम्याची तंतरली. मग एकदम गप्प झाला आणि त्याच्या सोल्जर कटसाठी खुर्चीवर बसला. दुकानात एक टी.व्ही. चालू होता आणि त्याचे चॅनल आमचा नागेश बदलत बसलेला. नाम्याचंच नशीब बघा, नागेश नेमका 'गदर' ह्याच पिक्चरवर येऊन थांबला. पाकिस्तानी सलूनवाला अचानक थांबला आणि एकदा नागेशकडे नजर टाकली. नाम्या सोडून बाकी कुणालाच काय झालं ते नाही समजलं. 'सनी देओल' हॅन्डपंप उखडतो तो सीन चालू झाला आणि सलूनवाला नाम्याचे केस त्याच स्टाईलमध्ये उखडू लागला. नाम्या आम्हाला खुणावत होता पण लक्ष कोणीच देईना. त्याची कटिंग झाली आणि आम्ही दुकानातून बाहेर पडलो. बाहेर पडताना सुद्धा नजर टी.व्ही. कडेच होती आमची. आम्ही जरा आडबाजूला आलो आणि मग नाम्याने शिव्यांचं म्यूजियम उघडलं. मला, नागेशला, केदारला आई-बहिणीच्या इतक्या शिव्या झाल्या, आणि मग आम्हाला आमची चूक समजली. हसणं कंट्रोल होत नव्हतं, आणि नाम्याला मानेवरची जळजळ सहन होत नव्हती. सलूनवाल्याला सनी देओलनी फारच पेटवलेलं. गळ्यावरून वस्तरा फिरवता आला नाही म्हणून त्यानं सगळा राग मागच्या गल्लीत, मानेवर काढला होता. कोकचा चिल्ड कॅन लावून नाम्या मानेला शांत करत होता.

नाम्या जेव्हा जो-बर्गला आला तेव्हा त्याच्या बायकोला कायगोलीला सोडून आलेला. तिच्याजवळ मोबाईल होता, पण कॉल्स महा महाग राव! आठवड्यातून एखादा कॉल करायचा तो, आणि ते सुद्धा मस्त तासभर. तसं नुक्तंच लग्नं झालेलं त्यांचं, सो तो जरा जास्तच मिस करत होता तिला. नाम्याला कधीच कोणत्या मुलीशी बोलताना मी ऐकलं नव्हतं, त्यामुळे बायकोशी तरी कसं बोलतो हे मला एक कोडंच होतं. तसा अधूनमधून माझ्याकडून टिप्स घ्यायचा, पण इमप्लीमेन्ट झालेलं कोणीच नव्हतं ऐकलं. एका रात्री मी कंपनीमधून उशिरा घरी आलो आणि नाम्याच्या रूमवर गेलो. दार सताड उघडं टाकून, अगदी अंधारात नाम्या बायकोशी बोलत होता. तसे कोणाचे पर्सनल कॉल्स ऐकू नयेत, पण माझ्या अंगातले किडे वळवळत होते. नाम्या नक्की बोलतो कसा हे मला ऐकायचं होतं. तो डोक्यावरून पांघरूण घेऊन आरामात पडलेला, आणि आतून आवाज ऐकू येत होता. मी जवळ जाऊन ऐकू लागलो.

"हं... काय म्हनली?... काही ऐकू येऊन नाही राहिलं... कुठंय तू आत्ता?" नाम्याचं पुटपुटणं सुद्धा अगदी क्लीयर ऐकू येत होतं. मी मोबाईलचा रेकॉर्डर चालू केला. किडेच ते, त्यांना मी तरी कसं आवरू!

"अगं त्ये रानात कशाला गेली आत्ता! त्ये शिंत्रे तिथंच बसतात परसाकडला. झाडामागून म्हातारा कधी आनि काय ऐकल काही भरवसा नाही. तुला घान कशी वाटत नाही गं!" मी तोंडात टॉवेल घातलेला हसू आवरायला.

"आनि बाकी कशेत सगळे?... हं...हं... माझी आठवन येती का? तुले येत नसेल, तरी मले फार येती" हे मले-तुले अधून मधून बऱ्याच वेळेला ऐकलय नाम्याच्या तोंडून; ग्रामीण विदर्भातली अजून एक मराठी अदा.

मग एकदम रॉमॅन्टीक नाम्या जागा झाला, "बाहेर चंद्र पाहिलास का शीतल? कशी पोर्निमा खुलून राहिलीये

बघ जरा. त्या चंद्राकडं पाहिलं की तुझीच आठवन यून रहिली बघ मले” डोक्यावरून चादर ओढलेली ह्या ह***, आणि ह्याला चंद्र दिसला बरं का!

“आ, काय सांगते! आज पोर्निमा नाही? चंद्र अर्धाच दिसतोय? आयला मला कसा पुर्न चंद्र दिसून राहिला मग! त्ये देश बदलला ना की चंद्राची डायरेक्शन पन बदलते बघ” अगगग! थाप मारावी, पण इतकी मोठी! माझ्या तोंडातला टॉवेल मी अजूनच आत दाबला. डोळ्यातून पाणी वाहू लागलेलं आणि हसू कंट्रोल करणं अवघड होत होतं.

आणि फायनली, “चल आता ठेवतो रानी; बिल वाढत चाललंय. आय लव यू, म्हन की येकदा... आयला म्हनलंस की लगेच! मले वाटलं लाजशील. प्र्याकटीस दिसून राहिली तुले.” आणि मग स्वत:च जोरात हसला. खुद्द बायकोला असलं स्टेटमेन्ट हाच मारू शकतो. त्याने फोन कट केला आणि मी तोंडातला बोळा काढून जोरजोरात हसायला लागलो. अंधारात दचकला नाम्या, आणि मग जेव्हा ते रेकॉर्डिंग त्याला ऐकवलं, तेव्हा माझ्या उरावर बसून ते डिलिट करायला लावलं. ॲक्चुअली ते डिलिट केलं नाही मी, अजून सुद्धा माझ्या मोबाईलमध्ये आहे. सॉरी काय करू, आहेतच तसे किडे अंगात!

त. टी.: ह्यातील सर्व नावे, पात्रे व घटना संपूर्णपणे काल्पनिक आहेत. कोणतेही साधर्म्य सापडल्यास निव्वळ योगायोग समजावा.

समीर कुलकर्णी

मोहिनी

दिसण्यात भारी ही सुंदरी
मोहिनी आली ही भूवरी
नंदिनी स्वर्गाची ही जनी
सौख्य लोकांची ही वर्धिनी
अंगणी तिच्या मुले गोजरी
दिसतात ती बाले लाजरी
सदा सर्वदा ती बोलती मधुर
ऐकण्यास ते कान होती अधुर
भासते दिव्य ती अंतरी
सुखदायी भव्य ती अंबरी
सौजळ वागते ही लाघवी
जशी मोहनची ही माधवी
करातून सदा पुष्प वर्षती

पाहताच तिला सर्वजण हर्षती
सुख स्वप्ने अंतरी रंगवी
सदा अमृत घट सिंचवी
सुख नवी ही निर्झारिणी
सदा सर्वांचि ही हर्षवर्धणी



माधव ना. गोगावले

ॐ

महाराष्ट्र मंडळ शिकागो 2022

अध्यात्म पीठ

गुरुवार दिनांक २० जानेवारी २०२२

भजन: अंजली ट्रीअर

आपल्या लाडक्या रजनीताई पटवारी घेऊन येत आहेत

भगवद्गीता

१२ वा अध्याय

पठण व निरूपण

करुणात्रिपदी: सरोज घोडे

शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०



महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२२
अध्यात्म पीठ
गुरुवार दिनांक २७ जानेवारी २०२२
गीता १२ वा अध्याय पठण : रजनीताई पटवारी
ज्याची उत्सुकता लागून राहिली आहे त्या मोरया गोसावी यांच्या चरित्राचा उर्वरित भाग सांगतील अनिरुद्ध दामले.
करुणात्रिपदी: सरोज घोडे
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०

व्याख्यानाचा वृत्तान्त

विद्यावाचस्पति गुरुदेव श्री शंकर अभ्यंकर यांच्या 'स्वामी विवेकानंदांचा शिकागोमधील सर्वधर्म परिषदेतील दिग्विजय' या व्याख्यानाचा वृत्तान्त.

संध्याकाळची वेळ, गोदाघाटाचा भाग असलेल्या पटांगणावर तात्पुरतं व्यासपीठ उभं आहे. हळूहळू आबालवृद्ध त्या व्यासपीठाभोवती जमा होत आहेत. काहींनी वह्या पेनं आणली आहेत, काहींनी सतरंज्या. आणि झुळझुळत्या गोदावरीला साक्ष ठेवून आपापल्या प्रांतातले कितीतरी दिग्गज महिनाभर आपल्या अनुभवांचे संचित श्रोतृवर्गाच्या झोळीत टाकत त्यांना धन्य करत आहेत. ही आठवण आहे, ती महिनाभर चालणाऱ्या वसंत व्याख्यानमालेची. पुढे अमेरिकेत आल्यावर या अशा सुंदर, सांस्कृतिक गोष्टींना आता आपण मुकलो असे अपरिहार्यपणे मी मान्य करून टाकले. पण असं वाटत असतांनाच महाराष्ट्र मंडळ शिकागोने संक्रमण व्याख्यानमाला आयोजित केली आणि या सुखद आठवणींना उजाळा दिला. या सांस्कृतिक परंपरेची इथे मुहूर्तमेढ केली. त्याबद्दल महाराष्ट्र मंडळाचे व कार्यकारिणीचे शतशः आभार!

जवळपास महिनाभरापूर्वी विद्यावाचस्पती गुरुदेव श्री. शंकर अभ्यंकर यांचे MMC तर्फे आयोजित व्याख्यान ऐकण्याचा योग आला होता. तेव्हाच त्यांच्या ज्ञानाच्या व्याप्तीची, प्रचंड कार्याची आणि रसाळ वाणीची प्रचीती आली होती. त्यामुळे त्यांच्या तोंडून स्वामी विवेकानंदांच्या सर्वधर्म परिषदेतील दिग्विजयाचा इतिहास ऐकणे म्हणजे पर्वणीच याची खात्री होतीच.

आपल्या प्रज्ञेने, वाणीने आणि कर्तृत्वाने सूर्यासारखे तळपणारे, आपल्या मातृभूमीच्या उत्कर्षासाठी झटणारे योद्धा संन्यासी स्वामी विवेकानंद!! भारतीयांच्या मनात त्यांच्याबद्दल अत्यादर आहेच, पण त्यांच्या कर्तृत्वाचा सार्थ अभिमान देखील आहे!!

गुरुदेव श्री.अभ्यंकरांनी या विषयाची पूर्वपीठिका आणि पार्श्वभूमी समजावून सांगताना थोडक्यात भारतीय संस्कृती आजतागायत अनेक आक्रमणे सहन करूनही वेदान्तातल्या सत्याला न सोडल्यामुळे कशी अजूनही टिकून आहे याचा उल्लेख केला. पुढे नरेंद्रनाथांनी १८८६ ला घेतलेल्या संन्यासाच्या घटनेपासून सुरुवात करून त्यांच्या भारत परिक्रमेबद्दल, त्या दरम्यान त्यांना भेटलेल्या व्यक्तींबद्दल, घटनांबद्दल, त्यांनी लिहिलेल्या पत्रांबद्दल अतिशय रोचक माहिती सांगितली. हे सर्व सांगत असतांना त्या त्या घटनेची तारीख, त्याबद्दलच्या वर्तमानपत्रांतील नोंदी यांचे अभ्यासपूर्ण दाखले दिले.

भारत परिक्रमेत केलेल्या निरीक्षणातून, त्या काळच्या समाजाच्या अवलोकनातून स्वामी विवेकानंदांचे मन कसे व्यथित झाले होते आणि याचा परिणाम म्हणून या निर्लेप संन्याशाने परिक्रमा संपल्यावर कन्याकुमारीला शिलातलावर ध्यान करून कशी मातृभूमीच्या पुनरुत्थानाची शपथ घेतली. हे गुरुदेवांच्या वाणीतून ऐकतानाचा अनुभव भारावून टाकणारा होता.

स्वामी विवेकांनदांचे ध्येय निश्चित झाल्यानंतर त्यांनी कसा सर्वधर्म परिषदेत जाण्याचा निर्णय घेतला त्यांच्या शिष्यवृन्दाने कशी मदत केली, कशा अडचणी आल्या व त्यावर योगायोगाने कशी मात केली गेली याचा इतिहास रंजक होता. पंधरा जुलै १८९३ रोजी ते अमेरिकेत दाखल झाले. तेव्हापासून ते अकरा सप्टेंबर १८९३ रोजी परिषद सुरू झाली तोपर्यंत त्यांना कुठल्या अडचणींवर मात करावी लागली, जणू ही परिषद गाजवावी हा दैवी संकेत असल्याप्रमाणे त्यांना योगायोगाने कशी मदत मिळत गेली याचे वर्णन रोमांचकारी होते. त्यांच्या बुद्धिमत्तेने प्रभावित होऊन त्यांना जी माणसे भेटली त्यांचे वर्णन आणि दाखले, त्या काळातील परिस्थिती, शिकागो वर्ल्ड फेअरचे वर्णन, त्या दरम्यानची छायाचित्रे यामुळे जणू तेव्हाचा काळ आमच्यासमोर जिवन्त उभा राहिला.

Kate Sanborn, John Henry Wright, Mrs. Hale यांनी त्यांना वेळेवर केलेली मदत याचा रोमांचक इतिहास त्यांनी विवेकानंदांबद्दल लिहिलेल्या पत्रांच्या आधारे आणि छायाचित्रांच्या आधारे श्रोत्यांसमोर उभा केला आणि शेवटी त्यांनी केलेले सर्वधर्म परिषद, त्यातले वेगवेगळे वक्ते, त्यांच्या भाषणातील सारांश, स्वामी विवेकानंदांची मनःस्थिती आणि शेवटी आपल्या वक्तृत्वाने त्यांनी सभा आणि श्रोत्यांची मने कशी जिंकली याचे रोमांचक वर्णन ऐकून सर्व मंत्रमुग्ध झाले. तेव्हा जणू काही आपण या प्रसंगाची साक्ष आहोत असेच वाटत होते.

या व्याख्यानाच्या तांत्रिक बाबीबद्दल खास उल्लेख करावा लागेल. जेव्हा जेव्हा गुरुदेव एखाद्या व्यक्ती व प्रसंगाबद्दल बोलत तेव्हा तेव्हा त्यांच्यामागील डिजिटल पडद्यावर त्या संदर्भातील व्यक्तींची, पत्रांची अथवा वृत्तपत्रातल्या दाखल्यांची छायाचित्रे झळकत. गुरुदेवांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाने, ओघवत्या वक्तृत्वाने आणि त्यांच्या इतिहासातील नोंदी, दाखले, तारीखवार तपशील देण्याच्या पद्धतीने आम्हाला खरोखरच प्रभावित केलं.

स्वामी विवेकानंदांच्या रूपात जवळजवळ शतकापूर्वी एक प्रज्ञावंत, कर्तृत्ववान सूर्यासारखं व्यक्तिमत्व तळपून गेले. त्या सूर्याने आपल्या वेदान्त संस्कृतीतील सत्यांवर प्रकाश टाकून त्या संस्कृतीला विश्वाच्या पंक्तीत मानानं नेऊन बसवले. याची साक्ष असलेले, त्या सूर्याचे जणू अंशतः प्रतिबिंबच बंदिस्त केले असावे असे दाखले इतिहासात अनेक व्यक्तींनी आपल्या लेखणीतून लिहून ठेवले होते. ते विखुरलेले प्रकाशकण गोळाकरून आमच्यासमोर त्या सूर्याचा प्रकाश पुन्हा आणून ठेवला त्याबद्दल विद्यावाचस्पती गुरुदेव श्री. अभ्यंकरांचे आम्ही मनापासून ऋणी आहोत.

श्रद्धा भट

शब्द-फुले!

नीलाकाशी घुमटामधूनी
रविकिरणे ती आली धावुनी
चरणस्पर्श ती करिती वाकुनी
जाग कशी ती नाही अजुनी?

उडते पक्षी किलबिलती
हरित पर्ण हे सळसळती
दवबिंदूही आळविती
शब्द फुलांची पंचारती

नाही पोचली का अजुनी हाक
का रे करिशी डोळे झाक
अर्पिली तुजला भक्तिमाला
ऊठ विठ्ठला अरुणोदय झाला.

सौ. प्रतिभा चं जोशी

Party

I received an invitation for the party last year at the height of covid, both written and oral. “Aaji come to my birthday party. I am hosting it, ok; you sit in your car and pass by my house and honk when you reach near the front of the door. We will be standing outside. And Aaji, stay in the car and drive in the line and don't forget to give my gift. OK?” The sparkle in her 5year old's eyes and the enthusiasm was a blessing to us from the almighty lord.

Her mention of hosting the party took me back half a century. My school days were spent in Mumbai in an apartment. Space was an issue and inviting more than 2-3 families at a time was a big task due to lack of space. Those who came to the party, were in a hurry to go back due to transportation issues once it was dark. This was a problem for all the middle-class families who lived far from each other. Such functions, therefore, were conducted within families in the same building or the same development.

Coming to America was a different experience for me. In less than a month after we were here, the phone rang and we were invited to a party in one of our college classmates' apartment. Many had arrived in the USA a year or two before us. We loved the party and in no time our classmates started to invite us for their parties. Every time we attended the party, on our way back, we discussed that we had to reciprocate it but were looking for the occasion out of old Indian customs.

Lord was good to us and he soon brought the occasion with the arrival of a ‘new bundle of joy' in our family. Hosting the party was an experience by itself. But we spared no time and occasion. We had to start with getting the furniture, utensils, and party equipment. Size of the apartment and particularly the kitchen, prompted us to work extra hours to get things ready. There was no Indian catering then. Kitchen was small but enthusiasm was great. Whether we were on-call previous day or had it next day, did not alter the plans. All the preparations took 6 weeks and we were ready. I was very tense as it was my first experience. I cooked the whole night and cleaned the whole day and was fresh for the party as if nothing occurred. Quite a few families' first experience. We knew that alcohol was needed but our limit was to the beer. Schlitz was a popular brand those days. Surprisingly, few guests brought bottles of wine and that saved the day.

51 years back there were very few Indians in Chicago and the attendees included any and all with Indian descent. An over-tanned Chinese or Korean, whom we knew, was also accepted. Over the years, it narrowed down to only Indians with whom we worked or studied. Later, it got narrowed to

people with our common interests of music or cultural activities. We always tried our best to avoid being clannish with contacts restricted to our common linguistic community only. Now, it is down to those interested in Indian music and watching cricket on TV. Times and technology changed, and with that, unfortunately party attendees differed.

Time flew by. Milliards of parties we attended after that one, but we still remember the first one. Life was so simple then. Later years, our professions consumed most of the time. Invitations went through the secretaries; party planner made all the arrangement; serving lady moved from appetizers to the desert. My job as a hostess was to stand near the door and say high and bye, keep a smile on the face and try and look pretty. With years that was difficult too. Everything was there except of the old enthusiasm to meet and greet and talk about the family who could not attend. Time and age consumed all the old curiosities of life. Today I host the party following a pooja and flavors of the food and drinks change with the attendees. In between dancing was in style but soon aging joints and arthritis diminished that activity.

However, the flavor of home party has changed. Guests' diet is a big issue now. Few eat gluten-free. Others are diabetic with no-sugar added to tea or coffee. Few are on salt-free diet advised by their physician, whereas, others have letter from their Ayurvedic friend in India not to have particular content in the food. Many are vegans and handling that is not a joke either. Making arrangement for these dishes and labeling them right is a bigger task than conducting the party.

Hosting the parties still is a dream and fun. Still, some of our old friends come and we get a chance to talk of our old memories. At times we even talk about our old teachers in schools. Unfortunately, the number of attendees for such parties diminish every year. I am sad about it but my enthusiasm of hosting a function is still there.

Invitation of my granddaughter and the enthusiasm on her face brought back all these memories and I realized that the first party was the best due to the enthusiasm that brought on our face. Bad party? I don't know, we could check that with our guests.

Rekha Khandeparker

रामायण पुनरावलोकन

लहानपणी बघितलेलं रामानंद सागर यांचं चित्रित रामायण आणि वाल्मीकि ऋषींचं रामायण यात किती तफावत असू शकते, ह्याची मला व्याख्यान ऐकल्यावर थोडी का होईना, कल्पना आली आणि वाटलं, की आपलाच इतिहास आपल्याला किती कमी माहिती आहे!

रामायण ही काल्पनिक कथा आहे की इतिहास ह्या कळीच्या मुद्द्याला हात घातल्याबद्दल आणि त्याचा पाठपुरावा केल्याबद्दल श्री. सच्चिदानंद शेवडे यांचे मनःपूर्वक आभार!

शतकानुशतके परकीयांच्या सत्तेत राहून आपल्या भारताच्या सुवर्ण इतिहासाचा कसा ऱ्हास करण्यात आलाय याचाही त्यांनी छान शैलीत समाचार घेतला. त्या काळच्या राजकीय आणि शैक्षणिक संस्थांचे समाजामध्ये असणाऱ्या अभेद्य विश्वासार्हतेचे चित्र त्यांनी अगदी सहजरीत्या रेखाटले. जवळपास दीड-दोन तास बोलल्यावर हे केवळ रामायणातील बालखंडाचा ट्रेलर होता, असे समजल्यावर श्री. सच्चिदानंद यांच्या सखोल अभ्यासाची आणि उत्तम वक्तृत्वाची कल्पना आली. माझ्यासारख्या श्रोत्याला नवीन मराठी शब्दही शिकायला मिळाले उदाः अतिथी vs पाहुणे, व्यासपीठ vs मंच vs रंगमंच वगैरे.

त्यांच्यासारख्या अभ्यासकाचे विचार ऐकण्याची संधी दिल्याबद्दल महाराष्ट्र मंडळ शिकागोचे मनःपूर्वक आभार

सावनकुमार डुंबरे पाटील

"जागर महाराष्ट्राचा, उत्सव मराठीचा!"

नमस्कार मंडळी, नविन वर्षाभिनंदन

महाराष्ट्र मंडळ शिकागो 2022
परंपरा ग्रुप सादर करते "धुंधुर्मास ते मकरसंक्रांत" ऑनलाइन उत्सव.

हळदीकुंकू, बोरनाहान, नवविवाहित मकरसंक्रांत/प्रजासत्ताक दिनानिमित्त मुलांचे रेखाचित्र, जानेवारी महिन्यातील मुलांच्या वाढदिवसाची चित्रे, माइलस्टोन वाढदिवस तुम्हाला यातील कोणत्याही उपक्रमात स्वारस्य असल्यास आम्हाला संपर्क करा.

उल्का नगरकर
दीपा सावंत
स्वाती कुकियान
सारा बोंगाळे
राजेश हाटकर
ठिकाण- MMC ऑनलाइन कट्टा
वेळ- २८ जानेवारी @ ६.३० वाजता.
आम्हाला https://youtube.com/c/MaharashtraMandalChicago वर पहा
चला तर लवकरच भेटुया!

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२२

॥ इतिहासमंच ॥

प्रस्तुत करत आहे

आग्र्याहून सुटका

व्याख्यान: डॉ. अजित जोशी

आयोजन: चेतन रेगे, उल्का नगरकर, प्रसाद अथणीकर,
शलाका रेगे, अनुराधा केळकर, माधव गोगावले

वेळ: शुक्रवार, २८ जानेवारी २०२२

रात्रौ ८:०० ते ९:३० (शिकागो स्थानिक प्रमाणवेळ)



तिळ गुळ घ्या गोड गोड बोला
संक्रांतीच्या निमित्ताने
ढिपाडी ढिपांग टीम
घेऊन येत आहे...
भारतातील विविध राज्यांमधील नृत्य!
Happy Makar Sankrant
शनिवार दि. २९ जानेवारी, २०२२
वेळ - संध्याकाळी ७.००
स्थळ: MMC यूट्यूब
https://www.youtube.com/MaharashtraMandalChicago

एका शुभसंदेश पत्रिकेतील बालिकेस

(Message to the girl from greeting card)

धवल हिमाच्या वर्षति घारा
थर थर शाखा करती कंपन
झर झर चाले कोमल बाला
अजुन तिने ना जगले जीवन ॥

धाम तियेचें दूर राहिले
त्या अलिकडे इवला डोंगर
पाऊलवाटा बुजल्या होत्या
चरण त्यांवरी पडती सुंदर ॥

सोनसळी त्या केसांवरती
हिमबिंदू अति करती चमचम
सुवर्ण झाले घन चंदेरी
धरती झाली रजत मुलायम. ॥

जा बाळे तू जपून अपुल्या
सदनी तेथे उब मायेची
तुझी जाणती तेथे वसती
वार्ता करतिल क्षेम सुखाची. ॥

उजळील घरटे तुझ्या दर्शनी
खुशाल घे तू तिथे निवारा
नको आठवूं वाट उद्यांची
कोसळती का अती हिमधारा. ॥

तू तर एक संदेशवाहिका
चौकटीतले तुझेच जीवन
पुसले जाईल चित्र आजचे
नवीन संकटे, उद्या नविन दिन. ॥

रेखा. खंडेपारकर

पुस्तकातून प्रकाशाकडे

नमस्कार मंडळी! मी रत्नांगी निलेश मालपेकर, रहाणार लिंकनशायर. २०२२ मध्ये मी लिहिणार आहे मी वाचलेल्या, अगदी अभ्यास केलेल्या, काही 'हट के' पुस्तकांबद्दल!

या मालिकेतील पहिलं पुस्तक आहे '**CREATE THE FUTURE**'!

हे पुस्तक लिहिलं आहे, विख्यात लेखक जेरेमी गुसची यांनी! या पुस्तकाचे दोन भाग आहेत, एक 'Create the Future' आणि दुसरा 'The Innovation Handbook'. हे दोन्ही भाग मुख्यतः आहेत उद्योजकतेबद्दल (Entrepreneurship)! पहिल्या भागात, सध्या जगात काय चाललंय, काय कल आहे आणि त्याचा अभ्यास करून भविष्यात काय बदल होतील याच्यावर भाष्य केलं आहे, तर दुसऱ्या भागात कामात 'नावीन्य' (Innovation) कसं आणायचं याची संरचना (Framework) सांगितली आहे. दुसरा भाग वाचण्यासाठी मात्र तुम्हाला पुस्तक उलटं धरावं लागेल हं. या पुस्तकाचं अजून एक वैशिष्ट्य म्हणजे या पुस्तकाचं सार समजण्यासाठी, पुस्तकातील पानांवरची फक्त शीर्षकं वाचली तरी ते अगदी सहज समजेल. आणि लेखकाने हे केलं आहे, खास आपल्या सर्वांच्या बदललेल्या वाचनाच्या सवयीमुळे!

हे पुस्तक फक्त माहिती देत नाही तर अशक्य सुध्दा कसं शक्य आहे याचा मंत्र ते सांगतं. कोणतंही उद्दिष्ट साध्य करताना 'क्रिया' (Action) करणं किती महत्वाचं आहे हा विचार जेरेमी सांगतो. खूपदा आपल्याला निष्क्रियतेची सुद्धा सवय होऊन जाते, ती खटकत सुद्धा नाही आणि यामुळेच कितीतरी महत्वाच्या संधी कश्या गमावल्या जातात याचं सहज स्पष्टीकरण आपल्याला आपण काही गोष्टी का करत नाही, action का घेत नाही याचा विचार करायला लावतं. जग आपण समजतोय त्याच्यापेक्षा प्रचंड वेगाने बदलतंय आणि म्हणूनच एखाद्या गोष्टीबद्दल निवड करताना ती फायदेशीर आहे की नाही हे बघण्याऐवजी ती तुम्हाला भविष्यात किती पर्याय (options) देईल हा वेगळा विचार तो सांगतो. सध्याच्या कोविड काळात हे किती महत्त्वाचं आहे हे आपल्या सर्वांनाच ठाऊक आहेच.

आपलं उत्पादन कितीही चांगलं असलं तरी ते आपण ग्राहकाच्या नजरेतून बघायला हवं हा महत्वाचा पॉईंट ते सांगतं. तुम्हाला तुमचे ग्राहक नक्की माहिती आहेत का? त्यांच्या विचाराने तुम्हाला व्यापून टाकलं आहे का? त्यांच्या गरजांसाठी तुम्ही एखादी 'Cool' कल्पना सांगू शकता का? असे प्रश्न विचारून ते आपली झोप उडवतं. 'Break the rules' हा वेगळा मंत्र सांगून नवीन कल्पनांचा विचार करायला ते भाग पाडतं. हे असं का आणि ते तसं का याचं तर्कशास्त्र सांगण्याऐवजी आपल्या उत्पादनाची (product) गोष्ट सर्वांना सांगा, तुमच्या ग्राहकांना ती जास्त आवडते, असं ते सांगतं.

हे पुस्तक एकदा तरी वाचायलाच हवं! आपल्या रोजच्या गोष्टींकडे आपण कसे वेगळ्या दृष्टीने बघू शकतो आणि त्यातूनच 'नावीन्यपूर्ण उद्योजकता' कशी निर्माण होते त्याचं हे सुरेख उदाहरण! या लेखाविषयी आणि पुस्तकाविषयी तुमच्या प्रतिक्रिया नक्की कळवा.

आपली नम्र,
रत्नांगी निलेश मालपेकर
ratnangimmc@gmail.com

BUYING OR SELLING
Your house or investment properties
Total solution at one stop with dependable support team of
Priya Pathak
Call: 805-657-4706
• ATTORNEY • HOME INSPECTOR
• MORTGAGE • MOVING SERVICE
• INSURANCE • CLEANING SERVICE
• HANDYMAN • PROPERTY MANAGEMENT
PROVIDENT REALTY, INC.
Provident Realty Inc.
800 Woodfield Rd. Suite # 105 Schaumburg, IL 60173
847.995.0007 | Email: pathakrealtor@gmail.com
FREE MARKETING ANALYSIS
Call Priya for all your Real Estate needs

भुताने पकडले

नुकत्याच आमच्या वार्षिक परीक्षा संपल्या होत्या, उन्हाळा असल्यामुळे शेतीतीलही कामे नव्हती. त्यामुळे गप्पागोष्टी करण्यातच आम्ही संध्याकाळचा वेळ घालवीत होतो. वेगवेगळ्या गावातील यात्रा व आखाडे करणे असा गावातील बरेच जणांचा आवडता वेळ काढण्याचा बेत असे.

ह्या वर्षी आमच्या गावातील सयाजी पैलवान बहुतेक सगळ्या कुस्त्या जिंकत होता. सयाजी पैलवान वर्षभर कोल्हापूरला तालमीत कुस्त्या शिकायला आणि शरीर कमवायला होता. तिकडील व्यायाम, वेगवेगळे सराव, रस्त्यातच तुमच्यासमोर गाई-म्हशीचे दूध काढून निरसे धारोष्ण दूध पिणे, बदाम, गव्हाचा चीक यासारखा खुराक दररोज खायचा. वस्ताद हिंदकेसरी आंदळकर आणि इतर मल्लगुरूंबद्दल अनेक गोष्टी सांगत असे. असले सगळे किस्से ऐकून आम्ही सगळे जण भारावून जात असू. त्याकाळी बहुतेक सर्व पहिलवान खूप मोठा डगला सदरा / बंडी व घोळदार लेहंगा / पायजमा घालत असत. लोकांना आपल्या पीळदार शरीराची जाणीव होऊ नये म्हणून असे ते तीन ते पाच साईजने मोठे असलेले कपडे घालत. सयाजी पहिलवानाही तसेच डगली कपडे घालायचा.

एका गुरुवारी संध्याकाळी आम्ही पाच-सहा जण गावातील वेशीत आवळ्याच्या झाडाखाली चौथऱ्यावर गप्पा मारत बसलो होतो, त्या दिवशी अमावस्या होती. हळूहळू अंधार चांगलाच पडू लागला होता. दिनकरतात्या ही आमच्या गप्पागोष्टीत भाग घेत होते. अमावस्या असल्यामुळे आमचा गप्पा मारण्याचा कल भुतांच्या गोष्टींकडे वळला.

दिनकर तात्या म्हणाले, “आता सध्या सगळीकडे ग्रामीण भागात वीज आल्यापासून बहुतेक भुते गायब झाली आहेत”. दर गुरुवारी हमखास वीज जात असे. बहुतेक संपूर्ण महाराष्ट्रभर भारनियमनामुळे विजेचा प्रवाह दर गुरुवारी खंडित होत असे, आम्ही भुतांच्या गोष्टी बोलत असतानाच वीज गेली. अंधार आणखीनच वाढला आणि दिनकरतात्याने आम्हाला सांगितले, “पोरांनो, आता अंधार पडलाय आण आवास पण हाय तवा लवकर लवकर गावात निघून जा.” नुकत्याच मिसरुडी फुटलेले आम्ही किशोरवयाची मुले ऐकतील तरच ना. दिनकरतात्त्या लगेच उठले आणि गावाकडे निघून गेले.

आम्ही काहीजण भूतपिशाच यावर विश्वास ठेवत नव्हतो. सदूने आम्हाला गावी असलेल्या हडळीबद्दल सांगितले. नदीच्या पाणवठ्याजवळून जर एखादे लहान जावळ न काढलेले बालक नेले तर हडळ त्यांना झपाटून टाकत असे. त्या लहान मुलांना भूतबाधा होऊन ते हमखास तापाने फणफणून आजारी पडत, त्यामुळे आमच्या गावचे व शेजारील बऱ्याच गावातील लोक लहान मुलाला घेऊन त्या रस्त्याने जाणे टाळत असत. बऱ्याच वर्षांपूर्वी आमच्या गावी एक गोसावीबाबा काही महिन्यंसाठी आले होते. त्यांच्यासमोर अशा दोन-तीन लहान मुलांच्या गोष्टी घडल्या. त्यांनी कायमचा त्या हडळीचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. एक मुहूर्त पाहून अमावस्येपासून पौर्णिमेपर्यंत दररोज काहीतरी तांत्रिक-मांत्रिक उपाय करून घाट व पाणवठ्यावरून हडळीला तेथून कायमचे घालविण्याचे किंवा नष्ट करण्याचे सर्व प्रकार केले.

पौर्णिमेच्या दिवशी गोसावीबाबांनी हाडळीला आवाहन/विनंती केली, पाहिजे तर मला घे, पण निष्पाप लहान बालकांना त्रास देऊ नकोस.

पौर्णिमेच्या दिवशी शेवटचा मांत्रिक विधी झाल्यानंतर दोन दिवसातच गोसावीबाबा ह्या जगातून गेले. संन्याशांच्या रीतीप्रमाणे त्यांना गावकऱ्यांनी अग्निडाग देण्याऐवजी तिथेच पिंपळाजवळ स्मशानभूमीतच पुरले. त्या दिवसापासून हडळीने लहान

मुलांना कधीच त्रास दिला नाही असे गावातील ज्येष्ठ लोक सांगायचे.

गावातील काहीजण अमावस्या व पौर्णिमेच्या दिवशी पिंपळाखालील मुंजोबा व गोसावीबाबांना नारळ फोडायचे व निवद ठेवायचे. आमच्या भुतांच्या गोष्टी रंगल्या होत्या. सयाजी पहिलवान तावातावाने सांगत होता, "ही सगळी बकवास आहे आणि त्यावर माझा अजिबात विश्वास नाही. एखादं भूत आलं तर मी त्याला घुटनि डाव घालून गुदमरून टाकेल."

काळोख आणखीच गडद होऊ लागला होता. रातकिडे किर्र किर्र आवाज जोरजोरात करत होते. जवळील झाडावरील एक घुबडपण घू घू घू असे भीती वाढविणारा आवाज करत होतं.

आम्ही गावात आलो नाही असे पाहून दिनकरतात्यांनी हरीबरोबर एक कंदील पाठविला. थोड्या वेळातच रमेशही गावाच्या पश्चिम बाजूने एका हातात एकदम झोताने प्रकाश देणारी मोठी विजेरी - बॅटरी (Flashlight) घेऊन आला. त्याच्या दुसऱ्या हातात रुंद व लांबट डोक्याच्या लोखंडी खुंट्या लोहाराकडून आणलेल्या होत्या. तोही आमच्या भूतपिसाच्या गोष्टीत रंगला. नदीपलीकडच्या गावातलीही लाईट आता गेली. दाट काळोख्या अंधाराचे साम्राज्य सगळीकडे पसरले, ओढ्याच्या पलीकडील शेतातील घरातून एक कुत्रं इवळू लागले. कुत्री इवळणे हे येणाऱ्या संकटाचे संकेत मानला जाई. तीन-चार दिवस सतत कुत्री इवळत राहिली तर बरेच वेळा कोणीतरी दगावत असे. ते इवळणे ऐकून गावातील अनेक कुत्री मोठमोठ्याने इवळू लागली. ते खूपच भीतीदायक वाटत होते. अवळीच्या झाडावरून अचानक फाड फाड करत, चित्कारी टाकत, एक मोठा पक्षी घार की घुबड उडत स्मशानाच्या बाजूला आवाज करत गेला.

दामू म्हणाला, "पक्ष्याच्या रूपात हे भूतच स्मशानभूमीत गेलेलं वाटतय".

हे ऐकून वामन व सुरेश थरथर कापायला लागले आणि गावाकडे पळत सुटले.

मग मात्र सयाजी पैलवानाने त्या दोघांना कोल्हापुरी रांगड्या भाषेत एक दोन शिव्या हासडल्या. "हे रांडाच्यानो हिजड्यासारखे काय पळताय".

हे ऐकून रमेश सयाजीला म्हणाला, "तू एवढा ताकतवान धीट असशील तर मग आत्ताच जाऊन गोसावीबाबाजवळ ही एक खुंटी ठोकून ये".

सयाजी पैलवानाने पैज लावायचं ठरवलं. त्यावेळी खेड्यातील मुलांकडे जास्त पैसे नसायचे त्यामुळे आम्ही पैशाची पैज कधी लावायचो नाही. जर सयाजी पैलवान स्मशानभूमीत जाऊन खुंटी ठोकून आला तर आम्ही दररोज तालमीत जायचं आणि कमीत कमी तीन तरुण मुलांना आमच्याबरोबर आणायचं आणि सुट्टीत शाळा सुरू होईपर्यंत सर्वांनी जवळपासच्या गावातील आखाड्यामध्ये कुस्त्या करायच्या. जर सयाजी पहिलवान हरला तर त्याने पुढील दोन महिने दररोज महादेव व भैरवनाथाचे मंदिर आणि आसपासच्या भागाची झाडलोट करायची आणि सगळं साफ करायचं. ग्रामीण भागात सहसा पहिलवान कसली काम करत नसत. जर कुणी घरात मदत करत नसेल तर त्याला "काय पैलवानासारखा फिरतोय नुसता" असे म्हणायचे. झाडलोट करण्याचे काम पैलवानासाठी काही खरं नव्हतं. सयाजीने ती पैज मान्य केली. त्याला भलता आत्मविश्वास होता, की आपण नक्कीच ती लोखंडी खुंटी स्मशानभूमीत ठोकून येऊ व पैज सहज जिंकू. स्मशानभूमी फक्त चार-पाचशे मिटरवर होती. एका हातात रवीचा तो छोटा कंदील व दुसऱ्या हातात एक लोखंडाची खुंटी घेऊन तो स्मशान भुमीकडे चालू लागला वेशीच्या चौथऱ्यावर उभे राहून आम्ही तिकडे कंदिलाच्या धुगधुगत्या अंधुक उजेडाने तो किती पुढे जात आहे हे पाहत होतो. साधारणपणे गोसाईबाबाच्या समाधीपर्यंत गेला असेल त्यावेळी कंदिलाचा उजेड एकदम नाहीसा झाला. काही सेकंदात मोठी चित्कारी करत आणखी काहीतरी स्मशानभूमीच्या बाजूने उडतानाचा अंगावर शहारे आणणारा आवाज आला.

अचानक स्मशानभूमीतून सयाजी पैलवानाची किंकाळी ऐकू आली. "वाचवा वाचवा, मला भुताने पकडले. वाचवा वाचवा मला भुताने धरलं. वाचवा वाचवा" आणि त्यानंतर एकदम सन्नाटा पसरला.

आमच्यातील एक दोघांनी सयाजीला आरोळी ठोकली पण त्याचा काहीच प्रतिसाद मिळला नाही. आता मात्र आम्ही सर्वजण घाबरलो होतो. रमेश बॅटरीचा मोठा प्रकाश झोत स्मशानभूमीच्या बाजूला लावून पाहू लागला पण तिकडे सयाजीची काहीच हालचाल दिसत नव्हती.

अचानक रमेशच्या हातातील बॅटरी खाली पडून तीही बंद पडली. रमेश रागात कस खात म्हणाला, "मोठे वांध झालं, बॅटरीला पण आत्ताच बंद पडायचं होतं. भुताने बॅटरी पण बंद केली की काय आता". मग मात्र आम्ही मोठ्याने गावातील लोकांना हाका मारू लागलो.

थोड्याच वेळात दिनकरतात्या व चार पाच मोठी माणसे हिराचंद वाण्याची गॅसची मोठी बत्ती घेऊन आमच्याकडे पळत आले. आम्ही सर्वजण घाईघाईत स्मशानभूमीकडे गेलो. जवळ जाऊन पाहिलं, तर सयाजी पैलवान बेशुद्ध अवस्थेत जमिनीवर उताना पडला होता. बाजूलाच विझलेला कंदील पडला होता. त्याच्या तोंडावर थोडे पाणी सिंपडले परंतु त्याने कसलीच हालचाल केली नाही. आता मात्र सगळ्यांचे धाबे दणाणले होते. त्या पडल्या अवस्थेतच त्याचे हात, छाती व डोके आम्ही चोळू लागलो. एकाने पाण्याने भरलेला आख्खा तांब्या त्याच्या तोंडावर पाणी ओतून रिकामा केला. त्याला आम्ही उठवायचा व उचलण्याचा प्रयत्न केला पण तो उचलला जात नव्हता. दुसऱ्या बाजूला गॅसची बत्ती नेऊन पाहिले तर त्याचा घेरदार पायजमा व डगला सदरा लोखंडी खुंटीने जमिनीत ठोकलेला होता. (कंदील विझल्यानंतर अंधारात गडबडीने त्याने लांब सदऱ्याच्या टोकाला व घेरदार पायजम्यावरच लोखंडी खुंटी ठोकली होती त्यामुळे त्याला उठता आले नाही. सयाजीला वाटले, भुतानेच त्याला पकडून ठेवले. घाबरून तो बेशुद्ध पडला.) मोठ्या माणसांनी उचलून त्याला घरी आणले. सयाजीच्या सगळ्या अंगाला मालीस केल्यावर व गरम कपड्याने शेकविल्यानंतर काही वेळाने तो शुद्धीवर आला. आम्ही सर्वजण घाईघाईने प्रसंगावधान राखून तिकडे लगेच गेलो नसतो तर सयाजी पैलवानाचे भूत अमावस्येला गावात फिरू लागले असते.



माधव ना. गोगावले

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२२

साहित्यकट्टा सहर्ष सादर करत आहे

बोलका कट्टा

प्रभावी, समकालीन बालसाहित्य म्हणून जागतिक स्तरावर
प्रशंसाप्राप्त कथांचे अभिवाचन

लेखिका आणि सादरकर्त्या

स्वाती राजे

रविः ३० जाने. २२ स. ९ वा.(शिकागो वेळेनुसार)
रवि. रा. ८.३० वा. (भारतीय वेळेनुसार)

https://www.youtube.com/c/MaharashtraMandalChicago

MAHAARASHTRA MANDAL CHICAGO
2022
Y.O.U.T.H TEAM

CRAFT WORKSHOP FOR YOUTH TEAM MEMBERS

Dear Youth members,
On the occasion of Makar Sankranti, Maharashtra Mandal Chicago 2022 Y.O.U.T.H Team is excited to bring two DIY craft workshops for you to do at your own pace.

Date – Sunday, 30th January 2022
Time – 6:30 PM CST
Place – MMC YouTube Channel
Below is a YouTube link to watch the workshop video.

https://www.youtube.com/MaharashtraMandalChicago

List of materials for the workshop:-



1. Learn to make a kite - 2 construction papers- A4 size , Glue or stapler, Marker, Scissor, Thread

2. Learn to make a Fabric flower hair tie - Piece of fabric - 12 inches by 2 inches, Needle , Thread, Elastic Hair Ties, Pearl or Bead, Scissor

Please reach out to our Y.O.U.T.H. Team Coordinators if you have any questions: Ulka Nagarkar , Kashmira Magar, Shipra Athanikar, Arati Khot, Tejaswini Joshi, Prajakta Joshi, Sheetal Deshpande

मकर संक्रांतीच्या निमित्ताने
महाराष्ट्र मंडळ, शिकागोची
"चाय टाउन अंगात पंगत' टीम सादर
करीत आहे...

मकर संक्रांति एक आयुर्वेदिक दृष्टीकोण

MAKAR SANKRANTI AN AYURVEDIC PERSPECTIVE

रविवार दि. ३० जानेवारी, २०२२
वेळ संध्याकाळी ७ वाजता
स्थळ MMC युट्युब

https://youtube.com/c/MaharashtraMandalChicago

पुरणपोळी आईस्क्रीम

साहित्य:-

- १ वाटी चना डाळ
- पाव कप गूळ पावडर/ गूळ
- ३-४ टेबलस्पून इलायची पावडर
- १/२ टीस्पून केसर
- १ चिमूट जायफळ
- २ चमचे तूप
- आवश्यकतेनुसार पिस्ता गार्निशसाठी
- १/२ कप फुल क्रीम दूध
- पाव कप मिल्क मेड
- १/२ कप व्हिपिंग क्रीम

कृती:-

१ चणा डाळ रात्रभर भिजत ठेवा.

२ डाळ शिजेपर्यंत डाळ उकळा, जास्तीचे पाणी काढून टाका. बाजूला ठेवा

३ एका कढईत तूप टाका नंतर थोडीशी मॅश केलेली डाळ घाला, गूळ, इलायची पावडर घाला आणि ५-८ मिनिटे शिजवा. बाजू सोडल्यावर पुरण तयार होते. आचेवरून काढून केसर घाला.

४ १/२ कप फुल क्रीम दूध थोडे घट्ट होईपर्यंत गरम करा. मऊ शिजेपर्यंत व्हीपिंग क्रीम घोटून घ्या.

५ एका भांड्यात घट्ट दूध, कंडेन्स्ड मिल्क तयार पुरण टाकून मिक्स करा.

६ नंतर शेवटी व्हिपिंग क्रीम घाला आणि मिश्रण एका डब्यात/टिनमध्ये ओता.

७ आठ तास किंवा रात्रभर सेट करण्यासाठी ठेवा. चिरलेल्या पिस्त्याने किंवा गुलाब पाकळ्यांनी सजवा.

पुरण पोळी आईस्क्रीम आता स्कूपसाठी तयार आहे.

दिपाली सावंत

'रत्नांगीच्या रसोईतून' झटपट कालवण!

नमस्कार मंडळी! नवीन वर्षाच्या खूप शुभेच्छा! आज मी तुम्हांला सांगणार आहे, एका झटपट पाककृतीबद्दल ही पाककृती पटकन तर होतेच, पण त्यातला रस्सा सुद्धा गरम गरम प्यायला मजा येते. ही पाककृती शिकवल्याबद्दल, माझी बहीण, माई उर्फ डॉ. सौ. अनुराधा विजय पोतदार (पूर्वाश्रमीची रत्नश्री नीलरत्न जव्हेरी) हिचे मनःपूर्वक आभार.



साहित्य:-

- कोणत्याही माशाचे सहा छोटे तुकडे (इथे मी पापलेट आणि हलवा यांचे शेपटीच्या बाजूचे तुकडे घेतले आहेत.)
- पाच-सहा लसूण पाकळ्या ठेचलेल्या (कापलेल्या नाहीत)
- दोन मोठे चमचे तेल
- दोन मोठे चमचे चिंचेचा कोळ
- अर्धा च. हळद
- एक च. लाल मिरची पूड
- चवीपुरते मीठ

कृती:-

१ माशाच्या तुकड्यांना हळद, मिरची पूड आणि मीठ लावून दहा मिनिटे ठेवावे.

२ भांड्यात तेल गरम करून त्यात लसूण घालून, brown करून घ्यावी.

३ नंतर त्यात माशाचे तुकडे घालून, पाव कप पाणी घालावे.

४ नीट मिक्स करून, त्यात चिंचेचा कोळ घालून दहा-बारा मिनिटे उकळी येईपर्यंत ठेवावे.

५ गरम भात किंवा भाकरीबरोबर खावे.

लसूण आणि चिंचेचा स्वाद माशाबरोबर मस्त लागतो.

नक्की करून बघा आणि तुमच्या प्रतिक्रिया कळवा. काही प्रश्न असतील तर मला ratnangimmc@gmail.com या संकेतस्थळावर ई-मेल पाठवा.

आपली नम्र,
रत्नांगी निलेश मालपेकर

शब्दकोडे – उत्तर

१ अ	ग्नि	२ प	री	३ क्षा		४ हि	र	५ वे	रा	६ वे
भ्या		रो		७ र	८ ज	त		ळा		त
९ स	भा	प	ती		ख्ख		१० ता	प	मा	न
क्र		का		११ उ	ड	१२ ती		त्र		दा
१३ म	१४ टा	र	भा	त		१५ न	र	क	१६ द्वा	र
	की			१७ र	ड	वा			पा	
१८ ग	त	१९ वि	जे	ता		२० ज	टा	२१ धा	र	२२ क
झ		मा		२३ ना	२४ च	ता		रा		स
२५ ल	हा	न	से		का		२६ क	वा	य	त
का		से		२७ स	र	२८ ता		हि		री
२९ र	क्त	वा	हि	नी		३० बा	ह्य	क	व	च

श्रद्धांजली

महाराष्ट्र मंडळ शिकागोचे एक संस्थापक सभासद श्री. अनय राजपुरकर (१९३५-२०२२) ह्यांचे १६ जानेवारी रोजी दुःखद निधन झाले.

एक अतिशय मनमिळावू, आनंदी आणि रसिक म्हणून ते सर्व मित्रपरिवाराला प्रिय होते. त्यांच्या निधनाने एक जुना, जाणता आणि मंडळाच्या ५० वर्षांच्या इतिहासाचा साक्षीदार आपण गमावला. १९५९ साली बोटीने प्रवास करून इंग्लड, कॅनडा इथे वास्तव्य करत ते अमेरिकेत शिकागोच्या Sauk Village उपनगरात स्थायिक झाले. मराठी नाट्य-चित्रसृष्टीवर त्यांचे विशेष प्रेम होते.

राजपुरकर कुटुंबाच्या दुःखात महाराष्ट्र मंडळ शिकागो सहभागी आहे. त्यांच्या आत्म्यास शांती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

हरी ॐ.

निखळलेले तारे

गेल्या काही महिन्यात आपल्याला सोडून गेलेल्या दिग्गजांना महाराष्ट्र मंडळ शिकागोतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर

रमेश देव (ज्येष्ठ अभिनेते)

पं. बिरजू महाराज (कथक नर्तक)

अनिल अवचट
(लेखक, समाजसेवक)

किर्ती शिलेदार
(शास्त्रीय गायिका, अभिनेत्री)



रामदास कामत
(शास्त्रीय गायक, अभिनेते)

जनरल बिपिन रावत
(भारतीय सशस्त्र सेनेचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ)

पद्मश्री सिंधूताई सपकाळ
(समाजसेविका)

बेटी व्हाइट
(अमेरिकन अभिनेत्री, हास्यकलाकार)

सिडनी पॉटीये
(अमेरिकन अभिनेते, दिग्दर्शक, डिप्लोमॅट)

बॉब सॅगेट
(अमेरिकन टेलिव्हिजन अभिनेता, होस्ट)

Piccony & Patankar P.C.
Attorneys at Law
With Our Best Compliments from Piccony & Patankar, P.C.
Areas of Practice
Estate Planning
Taxation
Real Estate Buy and Sale
Family Law
Business Formation
Personal Injury
Traffic Law
Piccony & Patankar, P.C.
1700 North Farnsworth Avenue, Suite 28, Aurora, IL 60505
Phone: 630-820-8877
www.picconypatankar.com

SAVE BIG$$$
PMSInc
Great Rates & No Closing cost Options
Wide variety of mortgage products with great service and support
1 Compare wholesale mortgage rates from multiple banks and lenders
2 No monthly M.I. Mortgage options upto 95% loan to value
3 Get more loan options. We work with multiple banks and lenders.
FREE Consultation
Knowledgeable and Responsive
Ashok Lakshmanan
Mortgage Broker
NMLS#238977
Professional Mortgage Solutions, Inc.
(An Illinois Residential Mortgage Licensee)
NMLS#237990
630.205.8676
1776 Legacy Circle, Ste#107 • Naperville, IL 60563 • Off: 630.717.3600 • Fax: 630.717.3601